सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. ०९ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महिला दिनानिमित्त पंतप्रधानांकडून महिला शक्ती आणि कामगिरीला सलाम




नवी दिल्ली : महिला शक्ती आणि कामगिरीला सलाम म्हणून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म विविध क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या यशस्वी महिलांना सोपवले आहे. आज आंतरराष्ट्रीय महिला दिनी, यशस्वी महिला पंतप्रधानांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्यांच्या कथा आणि विचार सामायिक करीत आहेत.

पंतप्रधानांच्या एक्स या समाजमाध्यमावरील अकाउंटवर यशस्वी महिलांनी पोस्ट केले की: अंतराळ तंत्रज्ञान, अणु तंत्रज्ञान आणि महिला सक्षमीकरण आम्ही दोघी अर्थात एलिना मिश्रा, अणुशास्त्रज्ञ आणि शिल्पी सोनी, अवकाश शास्त्रज्ञ आहोत आणि आम्हाला महिलादिनी पंतप्रधानांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे नेतृत्व करताना खूप आनंद होत आहे. आमचा संदेश – भारत हे विज्ञानासाठी सर्वात चैतन्यशील ठिकाण आहे आणि म्हणूनच, आम्ही अधिकाधिक महिलांना ते शिकण्याचे आवाहन करतो.

# पीएम किसान सम्मान निधी योजनेत १८१ बोगस बांगलादेशी लाभार्थी

नाशिक : नाशिकमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रधानमंत्री किसान सम्मान निधी (झच् घळीरप डरारप छळवहळ धेक्षरपर) योजनेअंतर्गत १८१ बोगस लाभार्थींची नावे आढळून आली असून, हे लाभार्थी बांगलादेशी असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी कृषी अधिकारी कार्यालय आणि पोलीस ठाण्यास भेट देत तातडीने चौकशीची मागणी केली आहे.


किरीट सोमय्या यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, या प्रकरणाची सखोल चौकशी होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, बांगलादेशी घुसखोरीचा आणि सरकारी योजनांचा गैरवापर रोखणे अत्यावश्यक आहे.

ग्रामस्थांची सतर्कता आणि आठवडाभराच्या चौकशीत हा प्रकार उघडकीस आला. या १८१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आला. मात्र, याबाबत शंका निर्माण झाल्यानंतर पुढील हप्ते तत्काळ रोखण्यात आले. तहसीलदारांनी या प्रकरणी तक्रार दाखल करण्याचे मान्य केले असून, पोलिसांनीही गुन्हा दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे. सुरुवातीच्या तपासात या लाभार्थ्यांची बँक खाती बांगलादेशच्या सीमेलगत असलेल्या गावांशी संबंधित असल्याचे आढळून आले आहे. हे प्रकरण केवळ एकाच योजनेपुरते मर्यादित आहे की अन्य योजनांच्या बाबतीतही असे घडले आहे, याचा सखोल तपास सुरू आहे. गरज पडल्यास केंद्र सरकार, रिझर्व्ह बँक आणि सायबर सेलची मदत घेतली जाणार आहे. भादवण गावातील जागरूक ग्रामस्थांनी हा प्रकार लक्षात आणून दिला. यामुळे हा घोटाळा वेळीच उघड झाला. मालेगाव जन्मदाखला घोटाळ्यासारखाच हा प्रकार मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता दर्शवतो. पोलीस आणि प्रशासन या संपूर्ण प्रकरणाचा तपास करून सत्य बाहेर काढण्यासाठी सज्ज झाले आहेत.

या प्रकरणी पुढील तपास सुरू असून, अजूनही काही बोगस लाभार्थ्यांची नावे यादीत असण्याची शक्यता आहे. प्रशासनाच्या दक्षतेमुळे पुढील आर्थिक नुकसान टळले असले, तरी हे संपूर्ण रॅकेट शोधण्यासाठी अधिक गहन तपासाची गरज आहे.

## पुण्यात भेसळयुक्त १४00 किलो पनीर जप्त

पुणे : शहरात भेसळयुक्त पनीरची विक्री होत असल्याचा प्रकार अन्न आणि औषध प्रशासन विभागाने (एफडीए) आणि पोलिसांनी उघडकीस आणला. पोलिसांच्या पथकाने मांजरीतील एका भेसळयुक्त पनीर तयार करणाऱ्या उत्पादकाच्या कारखान्यात कारवाई केली. या कारवाईत १४०० किलो पनीर, भेसळ करण्यासाटी वापरली जाणारी १८०० किलो एसएमपी पावडर, ७१८ लिटर पामतेल असा ११ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मांजरी भागातील एका शेतातील गोदामात मोठ्या प्रमाणावर भेसळयुक्त पनीरचा साठा करण्यात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट सहाचे प्रभारी पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, पोलीस कर्मचारी सचिन पवार, रमेश मेमाणे यांना मिळाली.




# सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते रीजनल प्रॅक्टिशनर्स कन्व्हेन्शन (RPC) २०२५ चे उद्घाटन

### महाराष्ट्र सरकारच्या प्रकल्पांमध्ये CMA च्या भूमिकेवर भर



छत्रपती संभाजीनगर, ८ मार्च २०२५ – रीजनल प्रॅक्टिशनर्स कन्व्हेन्शन (RPC) २०२५ चे उद्घाटन आज महाराष्ट्र शासनाचे समाज न्याय मंत्री आणि छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री मा. संजय शिरसाटयांच्या हस्ते पार पडले. छत्रपती संभाजीनगर येथे चालू असलेल्या परिषदेस, गुजरात, मध्यप्रदेश, गोवा आणि छत्तीसगडमधील १०० हून अधिक कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स (CMA) यांनी सहभाग घेतला. तब्बल १४ वर्षांनंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये हा प्रतिष्ठित कार्यक्रम पार पडला असून, CMA व्यवसायिकांसाठी हा एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार आहे.

कार्यक्रमाला खासदार मा. संदीपन भुमरे (सांसद, लोकसभा) यांचीही उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मनोगतात CMA व्यवसायिकांनी कर व्यवस्थापन, आर्थिक नियोजन आणि सरकारच्या विविध वित्तीय धोरणांमध्ये योगदान देण्याची गरज असल्याचे नमूद केले.

उद्घाटनप्रसंगी मा. मंत्री संजय शिरसाटयांनी महाराष्ट्र शासनाच्या विविध प्रकल्पांमध्ये उचअ च्या कौशल्याचा उपयोग होण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी CMA समुदायाला आश्वासन दिले की, शासनाच्या वित्तीय व्यवस्थापन आणि लेखापरीक्षण प्रक्रियेत CMAs चा समावेश करण्यासाठी ते आवश्यक पावले उचलतील आणि विविध मंत्र्यांसोबत यासंबंधी पुढाकार घेतील.

या कार्यक्रमाला ICMAI - वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (WIRC) मधील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये CMA अरिंदम गोस्वामी (अध्यक्ष, ICMAI-WIRC), CMA मिहीर नारायण व्यास (उपाध्यक्ष, ICMAI-WIRC), CMA नंटी नलिनकुमार शहा (सचिव, ICMAI-WIRC), CMA चैतन्य लक्ष्मणराव मोहरिर (खजिनदार, ICMAI-WIRC), CMA नीरज डी. जोशी (CCM - ICMAI), CMA (डॉ.) आशिष पी. ठत्ते (CCM - ICMAI), CMA हर्षद एस. देशपांडे (CCM - ICMAI), CMA सलमान लियाकतखा पठाण (अध्यक्ष, औरंगाबाद चॅप्टर) आणि CMA बाबासाहेब रामनाथ शिंदे (उपाध्यक्ष, छ.संभाजीनगर चॅप्टर) यांचा समावेश होता.

या वेळी, CMA नीरज डी. जोशी, CMA (डॉ.) आशिष पी. ठत्ते आणि CMA हर्षद एस. देशपांडे यांनी ICMAI च्या उपक्रमांबाबत आणि डायरेक्ट टॅक्स कोड विधेयकात CMAs च्या भूमिकेबाबत माहिती दिली. त्यांनी असे स्पष्ट केले की कर प्रणाली ही एक स्वतंत्र विधी प्रक्रिया आहे आणि केवळ विशिष्ट व्यावसायिक गटापुरती मर्यादित नसावी. CMA तज्ज्ञांनी कर प्रणालीमध्ये CMAs चा समावेश करण्याच्या मागणीसाठी काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. त्यांनी सांगितले की आयकर कायद्यातील कलम २६८ अंतर्गत आधीच CMAs ना इन्व्हेंटरी व्हॅल्युएशनसाठी मान्यता आहे, तर त्यांचा समावेश टॅक्स अकाउंटिंगमध्ये करणे हे योग्य पाऊल असेल.

CMAs **साठी आयकरात अधिकृत मान्यता का असावी यावर त्यांनी खालील मुद्दे मांडले:** CMAs आधीच अनेक राज्यांमध्ये VAT ऑडिटसाठी अधिकृत आहेत, त्यामुळे त्यांचा समावेश आयकर व्यवस्थापनातही असावा. डायरेक्ट टॅक्स कोड कमिटी आणि अन्य समित्यांनी CMAs ना अकाउंटंट म्हणून समाविष्ट करण्याची शिफारस केली आहे. RPC 2025 च्या पुढील सत्रांमध्ये विविध तांत्रिक चर्चासत्रे होणार असून, सरकार आणि उद्योगक्षेत्राच्या CMA कडून असलेल्या अपेक्षा, आयकर कायद्यातील ताज्या घडामोडी, महिला सशक्तीकरण आणि CMA व्यवसायिकांसाठी भविष्यातील संधी या विषयांवर महत्त्वपूर्ण विचारमंथन होणार आहे.

# राज्य बँकेच्या इतिहासात प्रथमच रु.५00 कोटीचे बॉण्ड वितरीत करण्यास रिझर्व्ह बँकेची परवानगी



आर्थिकदृष्टया सुदृढ व उत्कृष्ठ बँकांच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या सर्व आर्थिक निकषांची पूर्तता राज्य बँकेने केल्याने इतिहासात प्रथमच रिझर्व्ह बँकेने राज्य सहकारी बँकेस रु.५०० कोटीचे १० वर्षाच्या दीर्घ मुदतीचे बॉण्ड वितरीत करण्यास नुकतीच परवानगी दिलेली आहे.

राज्य बँकेस गेल्या ५ वर्षापासून सतत उच्चांकी नफा होत आहे. गेल्या तीन वर्षात म्हणजे सन २०२२ मध्ये रु.६०३ कोटी, सन २०२३ मध्ये रु.६०९ कोटी व सन २०२४ मध्ये रु.६१५ कोटी नफा झाला आहे. राज्य बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या आदर्श प्रमाणाच्या आणि राष्ट्रीय मानांकनापेक्षा कितीतरी जास्त म्हणजे १६.३४ टक्के आहे. प्रोव्हीजन कव्हरेज रेशोचे सरासरी राष्ट्रीय मानांकन ६७.५८ टक्के असताना राज्य बँकेचे हे प्रमाण ८३.२८ टक्के इतके सक्षम आहे. राज्य बँकेचा व्यवस्थापन खर्च सरासरी राष्ट्रीय मानांकनापेक्षा खूप कमी म्हणजे ०.५५ टक्के आहे (राष्ट्रीय मानांकन ०.९८ टक्के). राज्य बँकेचा प्रति कर्मचारी व्यवसाय सरासरी राष्ट्रीय मानांकनापेक्षा दुप्पट म्हणजे रु.७६.१५ कोटी इतका आहे (राष्ट्रीय मानांकन ३५.७४ कोटी). तर राज्य बँकेचा प्रति शाखा व्यवसाय हा सरासरी राष्ट्रीय मानांकनापेक्षा साडेचार पटीने म्हणजे रु.१,००४.६४ कोटी इतका आहे (राष्ट्रीय सरासरी मानांकन रु.२७१.१५ कोटी). देशात सर्वात जास्त म्हणजे रु.५,००० कोटीपेक्षा जास्त नेटवर्थ असलेली राज्य बँक ही एकमेव सहकारी बँक आहे.

वरील आर्थिक परिस्थितीचा विचार करुन रिझर्व्ह बँकेने नुकतेच राज्य सहकारी बँकेस रु.५०० कोटीचे १० वर्षाच्या दिर्घ मुदतीचे बॉण्ड वितरीत करण्यास परवानगी दिली आहे.

या संदर्भात लवकरच राज्य बँकेतर्फे ऑफर प्रक्रिया सुरु होत असून, या मधील गुंतवणूकीसाठी कमीत कमी वैयक्तिक रु.१०,०००/- व संस्थात्मक रु.५०,०००/- इतकी मर्यादा ठेवण्यात येईल. सदर गुंतवणूक ही राज्य बँकेच्या भांडवलात जमा होणार असल्याने राज्य बँकेचा स्वनिधी आणखी मजबूत होण्यास मदत होणार आहे. यामुळे राज्य बँक सहकारातील त्रिस्तरीय पतरचना आणखी मजबूत करणार असून, त्याचा फायदा समाजातील सर्व घटकाला होईल असा विश्वास वाटतो.

### गंगापूर येथे जिल्हा न्यायालय व अतिरिक्त सत्र न्यायालय वरिष्ठ स्तर या दोन न्यायालयांचे आज उद्घाटन

गंगापूर : येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय वरिष्ठ स्तर या दोन न्यायालयांचे उद्घाटन रविवार (दि.९) मार्च रोजी होत आहे.अशी माहिती गंगापूर तालुका वकील संघाचे अध्यक्ष अड.किशोर कऱ्हाळे, सचिव अड. विठ्ठल काळे,उपाध्यक्ष अड.अमोल ठाकूर यांनी दिली.२७ फेब्रुवारीला तालुका वकील संघाला प्राप्त झालेल्या पत्रा नुसार रविवारी गंगापूर न्यायालय परिसरात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत मा.न्यायमूर्ती रवींद्र विठ्ठलराव घुगे उच्च न्यायालय मुंबई यांच्या शुभहस्ते, मा. न्यायमूर्ती मंगेश शिवाजीराव पाटील मुख्य अतिथी उच्च न्यायालय मुंबई , मा. न्यायमूर्ती संजय आनंदराव देशमुख उच्च न्यायालय मुंबई यांच्या प्रमुख उपस्थितीत, श्रीमती विभा प्रभाकरराव इंगळे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा न्यायालय व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवानी न्यायालय वरिष्ठ स्तर या दोन न्यायालयांचे उद्घाटन होणार आहे. सध्या गंगापूर तालुक्यासाठी जिल्हा न्यायालय म्हणून वैजापूरला जोडण्यात आले होते.या न्यायालयाची गंगापूर तालुक्यातील जनतेला बऱ्याच दिवसापासून प्रतीक्षा होती.या न्यायालयामुळे न्याय प्रक्रिया गतिमान होऊन पक्षकारांचा वेळ व पैसाही वाचेल,अशी माहिती पत्रकाद्वारे निमंत्रक अड.किशोर कऱ्हाळे व श्री.सुभाष के.कऱ्हाळे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश गंगापूर यांनी दिली.




# विद्युत प्रवाह खंडित शेतकरी आक्रमक ! महावितरण कार्यालयात मांडला ठिय्या !

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०८ मार्च – शहरानजीक असलेल्या माळीवाडा परिसरात वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने वैतागुन शेतकऱ्यांनी दि.०८ रोजी महावितरण कार्यालयात ठिय्या मांडला होता

माळीवाडा सह परिसरात वारंवार विद्युत प्रवाह खंडित होत असल्याने शेतीच्या मशागतीसाठी मोठी अडचण निर्माण होत असल्याने आक्रमक झालेले शेतकरी थेट महावितरण कार्यालयात धडकले आक्रमक शेतकऱ्यांनी सर्व फिडर बंद करण्याची मागणी करत ठिय्या मांडला होता त्यामुळे काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले होते.

रिठ्ठी फिडर अंर्तगत माळीवाडा परिसरातील शेतकऱ्यांना विद्युत पुरवठा होत आहे पण हे फिडर वारंवार बंद होत असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देण्यासाठी तारेवरची कसरत करवी लागत आहे,मागील महिन्यात महावितरणच्या वेळापत्रका नुसार रात्रपाळी मध्ये विद्युत पुरवठा सुरू होता त्यावेळेस रात्रीच्या वेळेला जीव मुठीत धरून शेतकरी आपल्या पिकांना जगवण्यासाठी शेतकरी धडपडत होता,चालू महिन्यात वेळापत्रकामध्ये बदल झाल्यानुसार दिवसपाळी सूरु झाली आहे,दिवस पाळीमध्ये विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने अखेर वैतागून शेतकरी महावितरण कार्यालयात धडकले,

या परिसरात सध्या टोमॅटोच्या रोपांची लागवडीचे कामे सुरू असुन जर वेळेवर मशागत झाली नाही तर मोठे नुकसान होईल त्यामुळे शेतकरी आक्रमक झाले होते.



**मी स्वतः वेळापत्रकानुसार शेतात लागवड करून पाणी देण्याचा प्रयत्न करत आहे,शेतात टॉमेटो रोपे लागवडीसाठी आणले असून लाईट नसल्याने रोपे लागवड करता येत नाही**

**नंदू शिरसे, शेतकरी**

**लाईट वेळेवर येत नसल्याने वारंवार अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे,लाईट नसल्याने शेतीची मशागत कशी करावी असा प्रश्न उपस्थित झाला आहे,**

**स्वप्नील जाधव, शेतकरी**

**रिठ्ठी फिडरवर अतिरिक्त विद्युत पुरवठा वाढल्याने वारंवार पुरवठा खंडित होत आहे,त्यासाठी आणखी नवीन रोहित्र(डी. पी.) बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे, लवकरच ही अडचण सुटेल**

**भरत खिल्लारे, उपकार्यकारी अभियंता महावितरण कन्नड**

# जालना ड्रायपोर्टच्या उभारणीस गती देण्यासाठी खा.डॉ.कल्याण काळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना येथील मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क (चचडझ) प्रकल्पाच्या उभारणीस गती देण्यासाठी जालना लोकसभा खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी संजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, एनएचएलएमएल, विकास मलिक, प्रकल्प व्यवस्थापक, एनएचएलएमएल, जालना, मनोज निराळा, वरिष्ठ विभाग अभियंता (रेल्वे), जालना, मस्तान शहा, एमआयडीसी, जालना, संजय सराग, अधीक्षक अभियंता, महावितरण हे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली, कारण गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होऊनही प्रकल्प अद्याप सुरू झालेला नाही. अधिकाऱ्यांनी मार्च २०२५ अखेर प्रकल्प सुरू होईल, असे सांगितले असले तरी त्यास आणखी वेळ लागु शकतो असे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी अधिकाऱ्यांना खडसावले. जालना चचडझ प्रकल्पासाठी आवश्यक सुविधा व प्रगतीचा आढावा



घेतला असता, पुढील मुद्दे समोर आले:
१. रेल्वे साइडिंग: २२ एकर जागेवर रेल्वे साइडिंग पूर्ण झाली असून, २९ मार्च २०२३ रोजी इंजिन चाचणी यशस्वी झाली आहे. मात्र, इन-मोशन वजन काटा अद्याप बसवायचा आहे.
२. पाणीपुरवठा: चखऊउ च्या जलवाहिनीचे रेल्वे लाईन क्रॉसिंगचे काम अपूर्ण आहे. ६० मीटर काम प्रलंबित असून, यासाठी १०.४७ लाख रुपये भरण्यासाठी छक्ष्चङ ने संमती दिली आहे. ३. वीजपुरवठा: २०० घत- ट्रान्सफॉर्मरचे काम पूर्ण झाले आहे, मात्र अंतिम कनेक्शन देण्याची प्रक्रिया बाकी आहे. ४. बाह्य रस्ता: छक-७५२१ (औरंगाबाद-जालना महामार्ग) ते चचडझ जोडणाऱ्या रस्त्याचे १ किमी काम बाकी आहे. जालना-छत्रपती संभाजीनगर मार्गावरील वाहतूक कोंडीसंदर्भात निर्णय खासदार डॉ. कल्याण काळे यांनी ड्रायपोर्टमुळे जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत चिंता व्यक्त केली. त्यामुळे या ठिकाणी उड्डाणपूल (फ्लायओव्हर) बांधण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. प्रकल्पास गती देण्यासाठी मंत्री महोदयांकडे बैठक ड्रायपोर्ट त्वरित सुरू व्हावा यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांसह मंत्री महोदयांकडे बैठक बोलावली जाईल, अशी माहिती खासदार डॉ. कल्याण काळे यांनी दिली. एमएमएलपी जालना हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, तो कार्यान्वित झाल्यास मराठवाड्यातील औद्योगिक आणि कृषी उत्पादनांच्या वाहतुकीस गती मिळेल. मात्र, काम रखडल्याने स्थानिक उद्योजक व व्यापारी वर्गात नाराजी आहे. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी अधिकाऱ्यांना वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

## संक्षिप्त

### जाफराबादला संतोषी माता व कालिंका माता देवी ची प्राणप्रतिष्ठा



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद येथे कालिंका माता व संतोषी माता मंदिराचा जीर्णोद्धार होत असून दिनांक ८ व ९ मार्चला प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत आहे या भव्य दिव्य मंदिरामुळे जाफराबादच्या वैभवात भर पडत असून तालुक्याच्या श्रद्धास्थानी असलेल्या या दोन्ही मंदिरात भव्य कार्यक्रम संपन्न होत आहे दिनांक आठ मार्च रोजी दोन्ही मूर्तींची शहरातून मिरवणूक निघणार असून ९ मार्च रोजी दुपारी एक वाजता दोन्हीही मूर्ती ची प्राणप्रतिष्ठा होऊन महाप्रसाद वाटप होणार आहे श्री क्षेत्र सोनई येथील परमपूज्य अंबरीश महाराज यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली वेदशास्त्र संपन्न ब्रह्मवृंदांच्या मंत्रोपचारात हा विधी संपन्न होत आहे हे मंदिर शहराच्या मध्यभागी असून जवळपास १८ ते २० हजार स्क्वेअर फुट आवारा मध्ये मंदिर व सभागृहाचे बांधकाम होत आहे यासाठी जाफराबाद भोकरदन चे आमदार संतोष भाऊ दानवे यांनी ४० लाख रुपयाचा निधी देऊ केला आहे तर येथील नगरपंचायत ने वाल कंपाउंड साठी १८ लाख रुपयांचा निधी देऊ केला आहे शेकडो वर्षापासून या मंदिराचा लेखाजोखा व मुख्य कारभार येथील राजपूत समाजाकडे असुन शहरातील सर्व समाज एकत्र यावा यासाठी सर्व समाजाला या मंदिरात प्रतिनिधित्व करण्याचे स्थान दिले असून तसे मानकरी नेमलेले आहे

### गाळ्याच्या संदर्भात मुख्याधिकारी यांचा मनमानी कारभार; नगरपंचायतच्या गाळेधारकांना मुख्याधिकारी यांचे अभय

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मंठा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील व्यापाऱ्यांना नगरपंचायतकडून भाडेतत्त्वावर गाळे देण्यात आले होते. सदर गाडे मोडकळीस आले असून बांधकाम विभागाने गाळे काढून घेण्यात यावे , अशी नोटीस गाळेधारकांना दिली होती. याप्रकरणी मंठा मुख्याधिकारी दीपक इंगोले यांनी आर्थिक देवाण-घेवाण केली असल्याची चर्चा नागरिकात रंगत असून सदर गाळेधारकांना मुख्याधिकारी यांच्याकडून अभय भेटत असल्याचे दिसत आहे.

मंठा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील नगरपंचायत प्रशासनाने गाळे भाडे तत्त्वावर दिले आहेत. सदर गाळे मोडकळीस आले असून गाळे खाली करण्यासंदर्भात गाळेधारकांना नोटीस देखील देण्यात आली. सदर गाळेधारक खाली न करता त्यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयात धाव घेतल्यानंतर न्यायालयाने देखील सदर गाळे नगरपंचायत प्रशासनास खाली करून द्यावे असे आदेश काढले परंतु सदर आदेशाला देखील केराची टोपली नगरपंचायत प्रशासनाने दिली आहे. सदर गाळेधारकांना मुख्याधिकारी यांनी सील लावण्याऐवजी त्यांना पुन्हा मुदतवाढ दिली. सदर मुदतवाढ देण्याचे कारण आर्थिक देवाणघेवाण तर नाही ना अशी चर्चा शहरात रंगत आहे. त्याचबरोबर पोलीस प्रशासनाचा गाजावाजा करत नगरपंचायत मधील सर्व कर्मचारी अधिकारी चौकात जमा करून दिखावा करण्याचे काम मुख्याधिकारी यांनी केले. शासनाचा एवढा मोठा खर्च करून आपल्या अधिकारात असल्याचे बोलून गाळेधारकांना पुन्हा मुदतवाढ दिल्याची माहिती स्वतः मुख्याधिकारी यांनी दिली.

### महिला दिनानिमित्त पोलीस ठाण्यास राजमाता जिजाऊ यांची प्रतिमा भेट



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

राष्ट्रीय महिला दिनानिमित्त मंठा पोलीस ठाण्यात समाजसेविका कासाबाई शिरगुळे यांच्याकडून राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ यांची प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी पोलीस ठाणे अंमलदार एस.जे.काळुसे , सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आर.के.भिसे , पोलीस कर्मचारी कल्पना डोईफोडे , वर्षा जुंबडे यांच्यासह शिरगुडे यांच्या सहकारी महिला उपस्थित होत्या.

## ज्ञानराधा मल्टीस्टेट मधील सर्वसामान्य लोकांचे पैसे परत कधी करणार? -आ.बबनराव लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या जालना छत्रपती संभाजीनगर परभणी हिंगोली लातूर धाराशिव बीड यासह राज्यभरातील विविध शाखांमध्ये अनेक ठेवीदार व खातेदार यांनी अनेक वर्षांपासून एफ.डी. स्वरूपात तसेच बचत खात्यावर सोने तारण स्वरूपात तसेच रोख रक्कम ठेवलेली आहे. परंतु ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या तथाकथित घोटाळ्या दरम्यान महाराष्ट्रभरातील सर्व शाखा एकाच वेळी बंद पडल्या असून सर्वसामान्य नागरिक मात्र यामुळे प्रचंड त्रस्त आहेत. या सर्व सर्वसामान्यांनी गोरगरीब नागरिकांचे अडकलेले पैसे सरकार परत कधी करणार असा सवाल आज विधिमंडळात आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित केला.

ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या या कृतीमुळे बीड व जालना पोलिसांनी या प्रकरणात ठेवीदाराचे पैसे देण्यास कसूर केल्याबाबत गुन्हा नोंदवून ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीच्या अध्यक्षासह इतरांना अटक करण्यात आली त्यामुळे सदरहू ठेवीदार व खातेदार आर्थिक संकटात सापडले असून याबाबत ठेकेदार व खातेदार यांना न्याय मिळवून देणेसंबंधी शासनाने योग्य ती कारवाई करणे अपेक्षित आहे. या घोटाळ्यात लाखो ठेवीदारांना



कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. बीड, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, पुण्यातील शाखांमधून ईडीने सुमारे ९५ कोटींची संपत्ती जप्त केली आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटचे चेअरमन सुरेश कुटे यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त केली आहे. या मालमत्तेची किंमत १४३३ कोटी ४८ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी विधिमंडळात दिली. यावेळी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, या सर्व पतसंस्था केंद्र सरकारच्या अधिकारात येतात परंतु असे असले तरी आमदार बबनराव लोणीकर यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट घोटाळ्यासंदर्भात सविस्तर अभ्यास केलेला असून अत्यंत पोट तिडकीने वारंवार प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न मांडला आहे त्यामुळे आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य व केंद्र सरकार मध्ये समन्वय साधून यासंदर्भात लवकरात लवकर गोरगरिबांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील त्याचप्रमाणे केंद्र सरकारचे एक कार्यालय पुणे या ठिकाणी उभारण्यासंदर्भात देखील प्रयत्न केले जातील. या संदर्भात आमदार प्रकाश सोळंके यांनी जी माहिती आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे आहे ती सरकारकडे नाही काय? असा सवाल करत सरकारने याबाबत अत्यंत गांभीर्यपूर्वक भूमिका घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या घोटाळ्या संदर्भात व सर्वसामान्यांचे अडकलेल्या पैशासंदर्भात आपण प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न मांडलेले असून केवळ प्रत्येक अधिवेशनात प्रश्न मांडायचा आणि शासनाने परत परत तेच ते उत्तर द्यायचे असे किती दिवस चालणार असा सवाल आमदार बबनराव लोणीकर यांनी सरकारला विचारला. जर शासनाने या संदर्भात ठोस भूमिका घेतली नाही तर सर्वसामान्य नागरिक त्यांच्या मुलीचे लग्न कसे करणार मुलांची फीस कशी भरणार असे अनेक गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहतील व शेवटी आत्महत्येचा पर्याय त्यांना स्वीकारावा लागेल त्यामुळे ही बाब अत्यंत गंभीर असून या बाबीकडे शासनाने तातडीने व अत्यंत गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

## लाखे पाटील आणि अंबेकरांनी त्यांची हकालपट्टी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**

नवनाथ दौड तुमच्या दोघांच्या अख्त्यारीतील विषय आहे मात्र आपण दोघे एकमेकांकडे बोट दाखवून त्याच्या चुकीवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करीत आहात जे चुकीचे असुन आपल्या दोघांच्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही आपल्या दोघांची समाजामध्ये संवेदनशील नेता म्हणून ओळख आहे त्यास कलंक लागु देता कामा नये याची काळजी घ्यावी. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्दयीपणे केलेली हत्या प्रकरण संवेदनशील मनावर परिणाम करणारे आहे मारहाणीचे फोटो, मारेकऱ्यांनी केलेली नीच हरकत पाहुन थरकाप उडाला आहे. सरपंच देशमुख यांच्या मारेकऱ्यांना निश्चित फाशीची शिक्षा मिळावी मात्र त्याचबरोबर अन्वा येथे कैलास बो-हाडे यांना तापलेल्या लोखंडी सळीने चटके देणा-या नवनाथ दौड आणि भागवत दौड यांना देखील कठोर शिक्षा द्यावी.कैलास बो-हाडे प्रकरणाचा मास्टर माईंड नवनाथ दौड निर्दोष असल्याचा कांगावा डोळ्यावर झापड असलेले काही लोक करीत आहे. आपल्या जातीचा आहे म्हणून त्याची बाजू घेवून त्याच्या सैतानी वृत्तीवर पांझरुन घालण्याचा प्रयत्न करीत आहे. खरे तर गुंडाना कोणतीही जात नसते तरीही आपली वाया गेलेली लोकांच्या मुळावर उठलेली औलाद नीट करण्याऐवजी लोक पिडीतांच्या विरोधात उभे राहतात. नवनाथ दौड यांचे अनेक व्हीडीओ पुढील काळात उघड झाल्यावर त्याच्या पाठीमागे उभे राहणारे लोक हळुहळु अंग काढून घेतील.हाताला चटका बसला तर डोळ्यातून टचकन पाणी येते इथे तर लोखंडी सळीने कैलास बो-हाडेचे मास जाळले आहे. हा कातडी सोलण्याचा प्रयत्न माणुसकीला काळीमा फासणारा आहे. नवनाथ दौड आणि भागवत दौड यांनी गावातील अनेक लोकांना त्रास दिलेला आहे राजकीय साट्यालोट्यामुळे अनेक गोरगरिबांना पायाखाली चिरडून त्यांचा आवाज दाबलेला आहे मात्र पापांचा घडा भरल्यानंतर कुणीही वाचवण्यासाठी येत नाही हे विधीचे विधान आहे. योगेश केदार यांनी नवनाथ दौड यांच्या विरोधात पोस्ट केल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी केदार यांना चुकीची माहिती देवून नवनाथ दौड निर्दोष असल्याचे सांगितले मात्र आजचा व्हीडीओ बघून योगेश केदार नक्कीच व्यक्त होतील.अन्यायाच्या प्रकरणात सोयीस्कर भूमिका घेणा-या लोकांची किव येते.हातात कु-हाड घेवून मारायला जाणाऱ्या नवनाथ दौडचे खरे रुप पहायला मिळाले राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे यांनी नवनाथ दौड यास मदत करणाऱ्या लोकांना सह आरोपी करावे तसेच पोलीस प्रशासनाने फरार आरोपी नवनाथ दौड यास तातडीने अटक करावी. जालना जिल्हा जातीय संघर्षात पोळला जात असुन गावगाड्यात एकत्र नांदणारे वेगवेगळ्या जातीचे लोक अशा प्रकरणामुळे दुरावत चालले आहेत मैत्रीत कटुता येत आहे.

## ही सांज चिमणी पाखरांची या सांस्कृतीक कार्यक्रमात चिमुकल्यांनी उडविली धमाल

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद येथिल सिंहगड इंटर नॅशनल शाळेत ६ मार्च गुरुवार रोजी सायंकाळी ही सांज चिमणी पाखरांची या शिर्षकाखाली वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते यात मुलांच्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी, चांगली संस्कारक्षम पिढी घडविणे, व्यसनाचे दुष्परिणाम या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम सादर करण्यात आला.

भावसाक्षरता, वैज्ञानिक दृष्टिकोन, वाहन विवेक, राष्ट्रीय जबाबदारी, ध्येय निश्चिती, निसर्गाबाबतची कृतज्ञता या समाजमन घडवणाऱ्या विषयावर मुलांनी सुंदर सादरीकरण केले. केवळ नाट्य, नृत्य यांचा अविष्कार न राहता हे विचारांचे संमेलन बनले, हे संमेलन अंतर्मुख करणारे होते असे प्रतिपादन अध्यक्ष दुर्गेश नवले यांनी केले. यावेळी प्राचार्य अनिता नवले,राजेश काटकर , पांडुरंग पंडित, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश भारद्वाज, प्रकाश मिरगे, प्रल्हाद लोणकर,ज्ञानेश्वर पाबळे, विशाल वाकडे, नितिन राऊत, रघुनाथ भोपळे, समाधान सरोदे,निलेश जाधव, सिमा रिंढे, भोपळे सर, यांच्यासह पालक व ग्रामस्थाची मोठ्या संख्येने उप-



स्थिती होती. यावेळी प्रल्हाद लोणकर यांनी प्राण्यांचे आवाज काढून प्रेक्षकांचे मने जिंकली,तर विद्यार्थ्यांनी एकांकिका समूह नृत्य गीत गायन ,लावणी ,भारुड वासुदेव लोकगीत कोळीगीते, तांडव, पोवाडे, शिवकालीन देखावे, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम मावळे, यासह विविध गीतांवर नृत्य सादर करीत उपस्थितांची मने जिंकली तर रसिकांनीही उत्कृष्ट दाद दिली यावेळी गुणवान विद्यार्थ्यांना रोख रकमेचे बक्षीसही देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्ममिनी वाघ, तर आभार अमोल अक्कर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पद्मिनी वाघ, अमोल अक्कर, शिवनंदा गायकवाड, प्रिया खरात, अविनाश गायकवाड यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले.

## वाळू माफियांचा हैदोस

### मंठा शहरात दिवस-रात्र चढ्या दराने टाकली जाते वाळू; महसूल प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहर व परिसरामध्ये अवैध वाळू वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असून शहरात ठिकठिकाणी वाळू देखील चढ्या व मनमानी दराने वाळू माफिया रेती टाकली जाते. विशेष म्हणजे संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांचे दुर्लक्ष का होते. तहसीलदार , नायब तहसीलदार यांना ही गोष्ट माहीत नसेल तर का माहिती असून कार्यवाही का करत नाहीत. हा सर्वसामान्यसह पत्रकारांना पडलेला मोठा प्रश्न आहे.

मंठा तालुक्यातील पूर्णा नदी पात्रातील उस्वद , देवठाणा, किर्ला ,ईचा, टाकळखोपा, दुधा ,सासखेडा , खोरवड यासह पूर्णा नदीपात्रातून मंठा शहरासह तळणी परिसरात व इतर ठिकाणी वाळू वाहतूक केली जाते. त्याचबरोबर मंठाशहरात मोठ्या प्रमाणात अवैध वाळूची तस्करी करण्यात येते. परंतु , यावर प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अंकुश राहिला नसल्याने सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून या वाळू माफियांना मोठ्या -आका-चा पाठिंबा व अभय असल्याने यांच्यावर कारवाई करण्यास प्रशासनातील अधिकारी धजावत नाहीत. ही खूप मोठी शोकांतिका आहे. जालना जिल्हा त्यात मंठा तालुका अवैध वाळू माफीयांचे माहेरघर असल्याचे दिसून येते. दिवसाढवळ्या व रात्रभर वाळू माफिया शहरात हौदोस घालत आहेत.यावर कुठलेच प्रशासन ठोस भूमिका घेऊन कार्यवाही करत नाही. कोणी काही बोलण्यास गेले. तर त्यांना धमकवून गप्प केल्या जाते. सध्या मंठा तालुक्याची परिस्थिती फार भय्या व अवघड झाली आहे. यावर जिल्हा प्रशासनाने वेळीच गांभीर्याने लक्ष देऊन सर्वसामान्यांच्या भावना लक्षात घेऊन कार्यवाही करावी अशी माफक अपेक्षा सर्व स्तरातून होत आहे.

मंठा शहर व परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वाळू माफियांनी हैदोस घातला आहे.परंतु , याकडे महसूल प्रशासनातील अधिकारी कानाडोळा करत आहेत.त्यामुळे यांचे बळ अधिकच वाढत असून प्रशासनातील काही कर्मचारी व अधिकार्यामुळे तसेच -आका -च्या भरवशावर वाळूमाफिया सर्वसामान्य नागरिकासह कोणास काही समजत नसून त्यांच्यावर टिप्पर घालण्याची धमकी सुद्धा देतात. या वाळू माफियांना अभय मिळत असल्याने मंठा शहरांमध्ये दिवस-रात्र अवैध वाळू वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जाते.त्याचबरोबर सोशल मीडियाद्वारे रेती व मुरूम मिळेल असे देखील पोस्ट या वाळू माफिया कडून टाकली जाते, ही खरच खूप मोठी शोकांतिका आहे.प्रशासनातील अधिकारी या वाळू माफियांचे कानकोंडे असल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.मंठा तालुका व शहर गुंडगिरीकडे नेण्याचे काम प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून केले जात प्रशासनाची प्रतिमा देखील मलिन होत असल्याची खंत नागरिकांतून बोलली जात आहे.

## प्लास्टिक सर्जरी शिबिराने फुलविला १२४ जणांच्या आयुष्यात नवा आनंद

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ जालना, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे मिडटाऊन आणि रोटरी क्लब ऑफ ह्याटीनजेन यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन हॉस्पिटलमध्ये आयोजित दहा दिवसीय मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराने १२४ जणांच्या आयुष्यात नवीन आशा आणि आनंद निर्माण केला. या शिबिरात फाटलेले ओठ, चेहऱ्यावरील विकृती, जळीत जखमा, चिकटलेली बोटे, अपघातात झालेल्या जखमा आणि जन्मजात दोष असलेल्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ४




मार्च रोजी रुक्मिणी गार्डन येथे शिबिराच्या समारोप समारंभ पार पडला. मानवतेच्या या यज्ञात रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणाऱ्या जर्मन डॉक्टरांच्या टीमचे प्रमुख डॉ. गेरहार्ड आणि त्यांच्या टीमचा सत्कार करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया, सचिव रवी भक्कड, डॉ. क्रिस्टोफर मोजेस, रामनिवास मुंदडा, डॉ. माधव आंबेकर, सीए गोपाल राव, सीए प्रसाद राव, सुरेश अग्रवाल, शिवपाल शर्मा, अंबेश बियाणी, रवी झंवर, डॉ. श्याम मानधना, डॉ. विजय जेथलिया, अरुण मोहता, गोपाल मानधना आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्रास्ताविकपर भाषणात रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. दीपक बगडिया म्हणाले की, हे शिबिर म्हणजे केवळ वैद्यकीय मदत नव्हे, तर आशेचा किरण ठरले आहे. चेहऱ्यावर फुललेले नवसंजीवनीचे हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश आहे. गेल्या २० वर्षांपासून आम्ही हा मानवतेचा महायज्ञ करत आहोत. गरीब आणि गरजूंसाठी या शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. यावर्षी गुलाबचंद फाऊंडेशन, मुंबईचे आर्थिक सहकार्य लाभले. यावेळी पुढील वर्षीच्या शिबिराचे नियोजन करताना नियोजित अध्यक्ष वर्षा पित्ती आणि सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत यांनी जर्मन डॉक्टरांच्या टीमला पुढील वर्षीही सहभागी होण्याचे निमंत्रण दिले. समारोपप्रसंगी संस्कार प्रबोधिनी विद्यालयाचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत शिवकालीन युद्धकलेचे सादरीकरण केले.

# जायंटस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर प्राइड व भाग्यश्री फाउंडेशन तर्फे भव्य सामूहिक विवाह

विवाह हा मनुष्य जीवनातील १६ संस्कार पैकी एक अत्यंत महत्त्वाचा असा संस्कार आहे. विवाहप्रसंगी मनुष्य त्याच्या सर्व परी करण्याचा प्रयत्न करतो व अनावधानाने अनावश्यक असा खर्च करत असतो. वेळप्रसंगी कर्ज घेऊन सुद्धा विवाहाचे मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात. या अनावश्यक खर्चाला मात देण्यासाठी जायंटस् ग्रुप ऑफ छत्रपती संभाजी नगर प्राइडच्या व भाग्यश्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक विवाहाचे आयोजन दिनांक ३०.०४.२०२५ अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर आयोजित करण्यात आलेले आहे.

यामध्ये इच्छुक जोडप्यांचा सामूहिक विवाह प्रथम हिंदू धार्मिक पद्धतीने करण्यात येणार असून, जोडपे त्यांच्या पद्धतीनुसार सुद्धा विवाह करण्याची सोय करण्यात येईल. यापूर्वी वर्ष २०१८ मध्ये ५१ जोडप्यांचे तसेच २०२४ मध्ये ३३ जोडप्यांचे सामूहिक विवाह जायंटस प्राइड तर्फे यशस्वीरित्या करण्यात आला होता. वधू-वरास संसार उपयोगी लागणाऱ्या साहित्यांचे वाटप सुद्धा करण्यात येईल. यामध्ये गरीब, शेतकरी, नैसर्गिक आपत्तीग्रस्त, मजूर प्रवर्ग इत्यादीना प्राधान्य देण्यात येईल असे आवाहन आयोजकां तर्फे करण्यात आलेले आहे. सर्व इच्छुक वधू वर परिवारांनी ज्यांचे लग्न संबंध जुळलेले आहेत, त्यांनी ह्या सामूहिक विवाह कार्यक्रमात आपल्या पाल्यांचा विवाह करावा असे आव्हान आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. नाव नोंदणीची अंतिम तारीख ३१ मार्च २०२५ आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी श्री गोपाल सारडा यांना मो. क्रमांक ९१७२६६६७३९ किंवा श्री सचिन चव्हाण यांना मो. क्रमांक ७८८७८८८३९२ वर संपर्क साधावा व ह्या संधीचा लाभ घ्यावा.

## प्रल्हाद बारगजे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर – विश्व हिंदू परिषदेचे देवगिरी प्रांत अध्यक्ष मा. संजय आप्पा बारगजे यांचे वडील प्रल्हाद बारगजे वय वर्ष ९४ यांचे दिनांक ७ मार्चला दुपारी निधन झाले लगेचच दुपारी ४.३० वाजता त्यांचे निवासस्थान ओम निवास रामकृष्ण आश्रमासमोर बीड बायपास छत्रपती संभाजीनगर येथून अंत्ययात्रा निघून प्रतापनगर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

प्रल्हाद बारगजे पोलीस खात्यामध्ये नोकरीत असताना त्यांनी रजाकाराच्या अत्याचारात बळी पडलेल्या ७५० पोलिसांच्या कुटुंबीयांना पेन्शन मिळवून देण्याचे काम केले. सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या प्रल्हाद बारगजे यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या मागे तीन मुले एक मुलगी सुना जावई नातवंडे असा परिवार आहे.

## शामल शेळके यांची रचना सहाय्यकपदी निवड



कन्नड, दि.०८ मार्च - शहरातील शामल रंगनाथ शेळके यांची नगररचना विभागात रचना सहाय्यक पदी वर्णी लागली आहे,शामल यांनी मुलींमध्ये राज्यातून पाचवा क्रमांक घेत घवघवीत यश संपादन केले आहे. नुकत्याच झालेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये शामल यांनी तब्बल तीन परीक्षांमध्ये यश मिळवले आहे त्यात तीन वेळ वेगळ्या पदांसाठी त्यांची निवड झाली होती. मृदा व जलसंधारण विभागात वर्ग-२ अधिकारी पदावरही यशस्वी निवड झाली होती.स्पर्धा परीक्षेत कन्नड तालुका अग्रेसर झाला असून तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, शामल या मुलींमधून पाचवा क्रमांक घेतला आहे तर खुल्या वर्गातून चोपन्नवा क्रमांक मिळवला,शामल यांचे प्राथमिक शिक्षण कन्नड शहरात झाले तर अभियांत्रिकीचे शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथे झाले,साने गुरुजी विद्यालयाचे माध्यमिक शिक्षक रंगनाथ शेळके,आई उज्वला शेळके यांची मुलगी आहे,तिच्या या यशासाठी शहरातील विविध राजकिय, सामाजिक, व्यावसायिक,नवजीवन कॉलनीतील नागरिकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क. : ८७/२०२५

अर्जदार : १. संगिता लहू मराठे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. राहुल लहू मराठे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदारः कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर.ए. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत लहू भिका मराठे हे दि. २४/११/२०२० रोजी आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत लहू भिका मराठे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २१/०४/२०२५.

आज दि. ०५/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ९८/२०२५.

१. सगुना नामदेव राठोड, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. जंगलातांडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. सवीता अनील राठोड, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. हिंगणे, ता. जामनेर, जि. जळगांव. ३. गिता शिवाजी पवार, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. जिन्सी, ता. रावेर, जि. जळगांव, ४. गोपाल नरेंद्र पवार, वय २७ वर्षे, धंदा शेती, रा. तळबंद तांडा, ता. भडगांव, जि. जळगांव. ५. गोपीचंद नामदेव राठोड, वय २५ वर्षे, धंदा नौकरी, रा. जंगलातांडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नालोबाई बालु राठोड यांचा दिनांक १७/०८/२०२४ रोजी जंगलातांडा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ५ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत नालोबाई बालु राठोड यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०३/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.०७/०४/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क. ८६/२०२५

अर्जदार : १. शामराव गणपत मोरे, वय ९० वर्षे, भंदा शेती, रा. सातगांव डोंगरी, ता. पाचोरा, जि. जळगांव, ह.मु. वाकडी, ता. गोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. नाना शामराव मोरे, वय-५५ वर्षे, भंदा रा. वरीलप्रमाणे. शेती. ३. साहेबराव शामराव मोरे, वय ४८ वर्षे, भंदा रा. वरीलप्रमाणे. शेती, ४. भास्कर शामराव मोरे, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द

गैरअर्जदार : कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर.ए. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत यशोदाबाई शामराव मोरे ह्या दि. १४/०८/२०१८ रोजी सातगांव डोंगरी, ता. पाचोरा, जि. जळगांव येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार है मयत यशोदाबाई शामराव मोरे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०५/०४/२०२५.

आज दि. ०५/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क. १००/२०२५

अर्जदार : १. जयश्री काकासाहेब सपकाळ, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोहरी बु., ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. ऋतुराज काकासाहेब सपकाळ, वय-१२ वर्षे, अ.पा.क. जयश्री काकासाहेब सपकाळ, ३. अनिकेत काकासाहेब सपकाळ, वय-१० वर्षे, अ.पा.क. जयश्री काकासाहेब सपकाळ,

विरूध्द

गैरअर्जदार : कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. आर.ए. गिरी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत काकासाहेब भागाजी सपकाळ हे दि. २१/०८/२०२४ रोजी पोहरी बु., ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हे मयत काकासाहेब भागाजी सपकाळ यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २१/०४/२०२५.

आज दि. ०५/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १०५/२०२५.

१. हिरामण दलपत बोरसे, वय ८३ वर्षे, धंदा शेती, रा. गोंदेगांव, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. संतोष दलपत बोरसे, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा. गोंदेगांव, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, ३. जनार्दन दलपत बोरसे, वय ६४ वर्षे, धंदा शेती, रा. गोंदेगांव, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत दलपत गरबड बोरसे यांचा दिनांक १८/०३/१९९१ रोजी गोंदेगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत दलपत गरवड बोरसे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०३/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.११/०४/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३२७/२०२४ — पुढील तारीख १७/०२/२०२५

अर्जदार :- १- परिघाबाई भ्र. चांगदेव शिंदे वय ६५ वर्षे, धंदा- घरकाम रा, तांदुळवाडी, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २- गोकुळ चांगदेव शिंदे, वय- ४३ वर्षे, धंदा-शेती, रा. तांदुळवाडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३-कडुबा चांगदेव शिंदे, वय ३९ वर्षे, धंदा- शेती, रा. तांदुळवाडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद ४- कुसुम पंडीत पाटणकर, वय- ५८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. वडनेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५- आशाबाई भ्र. सुभाष काकडे, वय- ३८ वर्षे धंदा- घरकाम, रा. लोणी, ता. वैजापूर जि. औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्बदार : महाराष्ट्र शासन व्दारा- जिल्हाधिकारी, कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस. एन. उपासणी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार १ चे पती व अर्जदार २ ते ५ चे वडील नामे चांगदेव रामहरी शिंदे हे होते ते दिनांक ०४/०९/२०१२ रोजी मौजे तांदुळवाडी, ता. कन्नड येथे मयत झालेले आहेत. मयत चांगदेव शिंदे यांना अर्जदार क्र. १ पत्नी, अर्जदार क्र. २ ते ५ मुले व मुली हेच कायदेशीर वारस असुन अर्जदारां शिवाय मयतात इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी, महसुल व इतर दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवायकता आहे संबंधीत अधिकारी यांची वारस प्रमाणपत्राची मागणी केली करिता अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक /०३/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कार्यालय, सोयगाव**

**ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर**

ता.क्र.२०२५/जमा-२/कुळ /कावी-१६/२५ — दि. २५/०२/२०२५

### जाहीर प्रगटन

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री धनराज कवरु जाधव रा. लिहेतांडा ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर यांनी या कार्यालयात विनंती अर्ज सादर करुन मौजे जंगलातांडा येथील गट नं. ४३ क्षेत्र ०७ हे.११ आर ची शेतजमीन असून सदर शेतजमीनचे संपूर्ण गटाचे ७/१२ इतर अधिकार अभिलेख्यात हवकात भावडू तुकडू स.कु. १९५० दामू, पुजू सा.कु. या नावाचा अमंल असून सदर व्यक्तीचा सदर जमीनीशी प्रत्यक्ष/अपत्यक्ष काहीही संवध नाही, सदरील नोंदीमुळे अर्जदारास शासकीय कामकाजामध्ये अडचण निर्माण होत असल्याने सदर प्रकरणात प्रत्यक्ष पाहणी करुन सदर कुळाचा अंमल कमी करुन मिळावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे. प्रस्तूत शेतजमीनीचे ७/१२ इतर अधिकार अभिलेख्यातील भावडू तुकडू स.कु. १९५० दामू, पुजू सा.कु. या व्यक्तीच्या नावाचा ७/१२ इतर अधिकार अभिलेख्यातील अंमल कमी करणे संबधीची कार्यवाही या कार्यालयाचे स्तरावरुन सुरू आहे. सदर प्रकरणात संबधीत कुळ धारक अथवा कुळाच्या हित संबधितांनी सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून दि. १३/३/२०२५ पर्यंत सबळ पुराव्यानिशी या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत स्वतः अथवा विधीज्ञा मार्फत हजर राहुन लेखी स्वरुपात आपला आक्षेप / उजर / हरकत दाखल करावे. विहित मुदतीत आक्षेप/ उजर / या कार्यालयाकडे प्राप्त न झाल्यास कार्यवाही करण्यात येईल. विहीत कालावधीनंतर प्राप्त तक्रार /आक्षेप यांचा विचार केला जाणार नाही यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

तहसिलदीर सोयगाव तहसिलदार, सोयगाय

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद,**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:-११०/२०२५.

अर्जदारः १) इंदुबाई माणिक अहिरे, वयः ५६ वर्षे, धंदाः शेती, २) अमोल माणिक अहिरे, ययः ३४ वर्षे, धंदा शेती, वरील सर्व रा. मोहलाई ता. सोयगांव जि. औरंगाबाद ३) सिमा सुभाष गढरी, वयः ३७ वर्षे, धंदा शेती. रा. बदरखे ता. पाचोरा जि. जळगांव.

// विरूध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे माणिक नारायण अहिरे ही दिनांक २७/११/२०२२ ला मोहलाई ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- २८/०४/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ७/३/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव जि. औरंगाबाद

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १०७/२०२५.

१. शांताबाई सारंग सोहनी, वय ७० वर्षे, रा. सोयगांव, ता.सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. गोपाल सारंग सोहनी, वय २८ वर्षे, रा. सोयगांव, ता.सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळवण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सारंग विश्वनाथ सोहनी यांचा दिनांक ०७/१०/२०२४ रोजी सोयगांव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत सारंग विश्वनाथ सोहनी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल आजरोजी दिनांक ०४/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १६/०४/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

### जाहीर प्रगटन

**मा. ए.आय आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि अर्ज क्र. ४१/२०२५

अर्जदार : १-संगीता भ्र. काकासाहेब खरात, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोहरा ता. कन्नड जि. औरंगाबाद २- मयुरी पि. काकासाहेब खरात, वय- १६ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ , ३- गायत्री पि. काकासाहेब खरात, वय- १३ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ४-पल्लवी पि. काकासाहेब खरात, वय- ११ वर्षे धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ , ५-अंजली पि. काकासाहेब खरात, वय ८ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ६-आदित्य पि. काकासाहेब खरात, वय ४ वर्षे, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ७-फकीरराव बजाजी खरात, वय ६३ वर्षे, धंदा- मजुरी, रा. मोहरा ता. कन्नड जि. औरंगाबाद ८-कडुबाई फकीरराव खरात, वय- ५५, धंदा- घरकाम, रा. मोहरा ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस.एन. उपासणी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ते ६ यांची आई असुन अर्जदार क्र. ७ ते ८ हे अर्जदार क्र. १ चे सासु व सासरे आहे. अर्जदार क्र. १ चे पती अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील व अर्जदार क्र. ७ ते ८ यांचा मुलगा नामे काकासाहेब फकीरराव खरात हे होते ते दिनांक ०६/०५/२०२४ रोजी मोजे मोहरा ता. कन्नड येथे हदयविकाराचा झटका आल्याने मयत झालेले आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय, तलाटी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभघेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ८ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही,

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन. /०३/२०२५ दिनांक

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (६०) घोषणा

ही घटना आहे १९२३ सालची.

'हिंदू मुस्लिम भाई भाई' अशी घोषणा इंग्रज आणि डाव्या विचारसरणीचे लोक; तसेच महात्मा गांधीजी आपल्या प्रत्येक व्याख्यानात करीत असत. त्यामुळे जो जो या देशात राहील तो तो या देशाचा धनी अशी विकृत कल्पना अनेक हिंदूंच्या गळी पडू लागली. मग एकी टिकवण्यासाठी मशिदी समोरून जाताना वाद्ये वाजवू नका; असा उपदेश सुरू झाला. पहाटे काकड आरतीच्या टाळ-दिंडीला पण मज्ज्ञाव, इंग्रज सरकारने केला. हे डॉक्टरजींना पटले नाहीच; परंतु ही अशी भांडणे म्हणजे आंधळ्या हिंदू लोकांना दृष्टी आणणारी अंजने सुद्धा ठरली. डॉक्टरजी व नागपूरचे राजे लक्ष्मणराव भोसले यांनी नागपूरला हिंदू सभा स्थापन केल्याची घोषणा केली. तेव्हा दहा हजार लोकांची उपस्थिती होती व हिंदू धर्माचे हक्क सर्व हिंदूंना हिंदुस्थानात उपभोगता आले पाहिजेत, असे पत्रक त्यांनी सरकारला पाठवले. सरकारने मिरवणुकीला परवानगी दिली. तरीसुद्धा दिंडीवर दगड-विटा- जोडे- लाठी- काठी यांचा मारा मुसलमानांनी केला. व सरकारी आरक्षक मूक बनून पहात राहिले. मग मात्र शठम् प्रति शाठ्यम् याला अनुसरून दिंडी मिरवणुकीत गंधाचे ठळक टिळे लावून व हातात सणसणीत लाठ्या घेऊन मिरवणूक निघू लागली. यामुळे प्रतिपक्ष थंडावला. त्यानंतर १९२५ साली संघाचा जन्म झाला. मग टाळ सोबत लेझीम व लाठी युद्धाचा खेळ पण मिरवणुकीत होऊ लागला. हिंदू घराघरात लाठीकाठीची संख्या वाढली; जी आजही आवश्यक आहे. संघ शाखेत लाठीकाठीचे युद्ध शिकवणे सुरू झाले.

डॉक्टरजी व राजे लक्ष्मणराव भोसले नेहमीच सांगत की आता सौजन्याचे दूध प्रतिपक्षाच्या सापाला पाजणे बंद करा. कारण जगूं व जगवं अशी भूषणभूत मानवता प्रतिपक्षाला मान्य नाही. पुढाऱ्यांच्या आत्मघातकी व एकांगी घोषणेला बळी पडू नका. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**

छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१

माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

### जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ४०७/२०२४

अर्जदार : १- ईश्वर पिता भागवत केदार, वय ६० वर्षे, धंदा- शेती, रा. सायगव्हाण, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) २- बेबीबाई सभाष मोरे वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. पाच नंबर पोलिस चौकी मागे, उल्हासनगर, ठाणे ३-अण्णा पिता भागवत केदार, वय ३५ वर्षे, धंदा- शेती, रा. प्रबुध्द नगर सी-ब्लॉक, दत्त मंदीरा समोर, उल्हासनगर ठाणे ४-विनोद पिता भागवत केदार, वय ३४ वर्षे, धंदा दोती, रा. सायगव्हाण, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ५-मंगलबाई भ्र. दादा निकम, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंप्राळा, ता. चाळीसगांव, जिल्हा जळगांव ६-सरलाबाई नाना बागुल, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचगव्हाण, ता. चाळीसगांव जिल्हा जळगांव ७-रुखमनबाई भ्र. पिरा निकम, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. दिघी, पो. बदरखे, ता. पाचोरा, जिल्हा जळगांव ८- सखुबाई काशीनाथ सोनवणे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. दिघी पो. बदरखे, ता. पाचोरा, जिल्हा जळगांव

विरुध्द

गैरअर्जदार : १- महाराष्ट्र शासन, मार्फत- जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर (औरंगाबाद) २- नाना पिता आनंदा केदार, वय ६५ वर्षे, धंदा- शेती, रा. सायगव्हाण, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन अँक्ट प्रमाणे हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एस. एन. उपासणी यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, गैरअर्जदार क्रं. २ हे सदर अर्जात अर्जदार होणेस तयार नसल्याने त्यांना गैरअर्जदार क्रमांक २ करण्यात आले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ६ यांचे आजोबा, अर्जदार क्रमांक ७ ते ९ तसेच गैरअर्जदार क्रमांक २ यांचे वडील नामे आनंदा झिपरु केदार हे दिनांक ०१/०८/१९८८ रोजी मौजे सायगव्हाण ता. कन्नड येथे मयत झाले आहे, त्याच प्रमाणे मयत आनंदा झिपरु यांची पत्नी गौतमबाई आनंदा केदार ही देखील ४०-५० वर्षापुर्वीच मयत झालेली आहे. त्याच प्रमाणे वरील वारसांपैकी मयत आनंदा झिपरु केदार यांचा मोठा मुलगा भागवत आनंदा हा देखील दिनांक १८/०४/२०१९ रोजी मयत झाला आहे, त्याच प्रमाणे भागवत आनंदा याची पत्नी जायाबाई भागवत केदार ही देखील ३५-४० वर्षा पुर्वी मयत झालेली आहे, मयत यांचे विवाह भागवत व मयत झायाबाई यांचे विवाह संबंधातून अर्जदार क्रमांक १ ते ६ यांचा जन्म झालेला आहे. अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस कार्यवाही करणेसाठी तलाठी कार्यालय, ग्राम पंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक /०३/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. १७०/२०२५ — प्रकरणात पुढील तारीख १७/०४/२०२५

अर्जदार : १) शांताबाई भ्र. राजेंद्र पिंगळे वय ५५ वर्षे, धंदा घरकाम रा. श्री. कृष्णा कॉलनी जवळ, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) अमोल पिता राजेंद्र पिंगळे वय ३७ वर्षे, धंदा मजूरी रा. श्री. कृष्णा मंदिर जवळ, श्री कृष्णा कॉलनी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद मो. नं. ९७६६२३५४४६ ३) सोनल भ्र. गणेश पवार वय ३२ वर्षे, धंदा घरकाम रा. श्री कृष्णा कॉलनी, हर्सुल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) ऋषिकेश पिता राजेंद्र पिंगळे वय ३० वर्षे, धंदा मजूरी रा. श्री. कृष्णा कॉलनी, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे आहे. अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ४ यांची आई असून अर्जदार क्रं. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ, विवाहीत बहिण आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ४ यांचे वडील नामे राजेंद्र शहादराव पिंगळे हे दिनांक १४/०३/२०१९ रोजी मौजे हर्सुल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासरे व अर्जदार क्रं. २ ते ४ यांचे आजोबा नामे शहादराव पिंगळे हे दिनांक ०५/०६/१९९२ रोजी मौजे लासुर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ची सासु व अर्जदार क्रं. २ ते ४ यांची आजी ही बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असून तिच्या मयताबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांकडे उपलब्ध नाही. त्यामुळे मयत राजेंद्र शहादराव पिंगळे यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्रं. २ व ४ हे मुले असून अर्जदार क्र. ३ विवाहीत मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार आहे. मयतास अर्जदार क्रं. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत राजेंद्र शहादराव पिंगळे यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, गंगापूर

## अग्रलेख...

# घेऊनच टाका व्याप्त काश्मीर

व्याप्त काश्मीरबाबत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी केलेल्या ताज्या विधानामुळे पाकिस्तानला चांगलीच मिरची झोंबली आहे. व्याप्त काश्मीर भारताच्या ताब्यात आले की, काश्मीरची समस्या पूर्णपणे संपुष्टात येईल, असे विधान जयशंकर यांनी लंडनमध्ये एका कार्यक्रमात केले. चैथम हाऊसमधील एका कार्यक्रमात पाकिस्तानी पत्रकाराने जयशंकर यांना याबाबत प्रश्न विचारला होता. या प्रश्नाचा योग्य उपयोग करून घेत पाहुण्याच्या हातून साप मारावा, याप्रमाणे जयशंकर यांनी व्याप्त काश्मीर घेण्याबाबतचा भारताचा संकल्प जाहीर करून टाकला. जयशंकर यांची ही कृती म्हणजे 'मौके पे चौका'सारखी म्हणायला पाहिजे. जयशंकर यांचे सणसणीत उत्तर ऐकून कुठून हा प्रश्न मी त्यांना विचारला, अशी त्या पाकिस्तानी पत्रकाराची स्थिती झाली असेल. विशेष म्हणजे व्याप्त काश्मीर परत मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिस्थिती सध्या आपल्याला अनुकूल असल्याचा दाखलाही जयशंकर देतात. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आपल्याला अनुकूल असा बदल होत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. कधीकाळी अमेरिका पाकिस्तानची पाठराखण करत होता, पाकिस्तानचे हितसंबंध जपताना भारतावर अन्यायही करत होता; पण मोदी पंतप्रधान झाल्यानंतर यात बदल झाला. अमेरिका आता पाकिस्तानची आंधळी पाठराखण करत नाही. भारताचे महत्त्व त्याच्या लक्षात आले आहे. त्यामुळे भारताला दुखावून चालणार नाही, तर भारताला आपल्यासोबत घेऊन चालावे लागेल, असा मोठा धोरणात्मक बदल अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात झाला आहे.

अटलबिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी भारताला मुत्सद्दी आणि खमक्या असा परराष्ट्र व्यवहार मंत्री मिळाला आहे. काश्मीर समस्या सोडविण्याचा भारताचा चतु:सूत्री कार्यक्रम आहे. काश्मीर समस्या बऱ्याच प्रमाणात सोडविली आहे, असे जयशंकर म्हणाले. म्हणजे काश्मीर समस्येचा हत्ती गेला आणि शेपूट उरले, अशी स्थिती झाली आहे. काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम हटवणे, हे काश्मीर समस्या सोडविण्याचे पहिले पाऊल होते. काश्मीरमध्ये विकास प्रक्रिया सुरू करीत आर्थिक घडामोडींना गती देत सामाजिक न्यायाचा मार्ग प्रशस्त करणे हा दुसरा तर मतदान टक्केवारी शतप्रतिशत करणे हा तिसरा टप्पा होता, असे जयशंकर यांनी स्पष्ट केले. पाकिस्तानने चोरलेला व्याप्त काश्मीरचा भाग परत मिळविणे हा या लढाईतील चौथा आणि अंतिम टप्पा म्हणायला पाहिजे. ते भारतात येणार नाही, तोपर्यंत काश्मीर समस्या पूर्णपणे सुटली, असे आपल्याला म्हणता येणार नाही आणि पाकिस्तानच्या ताब्यात राहिला तर काश्मीरची जखम नेहमीसाठी भळभळतच राहणार आहे. काश्मीर समस्या सोडविण्याचे चार मार्ग जयशंकर यांनी सांगितले; त्यातील तीन मार्ग पूर्णपणे सुटले आहेत. गणिताच्या भाषेत बोलायचे तर काश्मीर समस्या ७५ टक्के सुटली आहे, आता फक्त २५ टक्के उरली आहे. जयशंकर यांची ही घोषणा मोदी सरकारच्या एका व्यापक धोरणाचा भाग आहे. याआधी गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेतही व्याप्त काश्मीर परत मिळविण्याचा संकल्प सोडला होता. व्याप्त काश्मीर हा भारताचा आहे आणि भारतातच तो राहील, असे शाह यांनी म्हटले होते. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही हा भारतात आल्याशिवाय राहणार नाही, काश्मीर परिसरात होत असलेला विकास पाहून तेथील लोक भारतात सामील होण्याची मागणी करतील, असे म्हटले होते.

काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, भारताचा मानबिंदू आहे. काश्मीर हा पाकिस्तानचा असूच शकत नाही, त्यामुळे व्याप्त काश्मीरवरील पाकिस्तानचा कब्जा हा पूर्णपणे बेकायदेशीर आहे. भाडेकरूने मालकाच्या घरातील एका खोलीवर बेकायदेशीरपणे कब्जा करण्यासारखे हे आहे. विशेष म्हणजे व्याप्त काश्मीरमधील लोकांना पाकिस्तान सापत्नभावाची वागणूक देत असतो. पाकिस्तानचे मूळ नागरिक त्यांना समजले जात नाही, तर दुय्यम नागरिक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. तेथील लोकांना सापत्नभावाची वागणूक दिली जात आहे. त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर दडपशाही सुरू आहे. व्याप्त काश्मीरमधील लोकांनी चिलास डायमर बाशा धरणाच्या दरवाजावर कुलपे ठोकली होती. हे धरण जगातील सर्वात उंचावरील धरण समजले जाते. मात्र, या धरणामुळे या भागातील लोकांवर पाकिस्तान अन्याय करीत आहे. त्यामुळे तेथील लोकांना आंदोलनही करावे लागले होते.

व्याप्त काश्मीर परत मिळविणे हे कठीण असले, तरी अशक्य बिलकूल नाही. पंतप्रधान मोदी यांनी मनात आणले तर काही मिनिटात ते भारतात समील करून घेऊ शकतात. फक्त त्यासाठी योग्य वेळेची ते वाटत पाहात आहेत, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते; ती वेळ आल्याशिवाय काही घडत नाही. मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपाच्या सरकारने ३७० कलम रद्द केले आणि अयोध्येतील राम जन्मभूमीवर भव्य-दिव्य असे राम मंदिर उभारले. २०१४ च्या आधी या दोन्ही गोष्टी अशक्य मानल्या जात होत्या. अयोध्येत कधीच राम मंदिर बनू शकणार नाही तसेच ३७० कलमही रद्द होणार नाही, असे देशातील बहुतांश लोकांना तेव्हा वाटत होते. कारण देशाची तेव्हाची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती वेगळी होती. पण २०१४ नंतर देशात मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार आल्यानंतर या दोन्ही गोष्टी चुटकीसरशी झाल्या. अयोध्येतील राम जन्मभूमीवर उभारण्यात आलेल्या मंदिरात रामललाच्या मूर्तीचे दर्शन घेतल्यानंतर देशातील बहुसंख्य लोकांना आपण स्वप्न तर पाहात नाही ना, असा अजूनही भास होतो. 'मोदी है तो मुमकिन है' असे जे म्हटले जाते, त्यामुळे हे घडून आले. त्यामुळे उद्या व्याप्त काश्मीरही भारताच्या ताब्यात आला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मोदी फक्त देशातील जनतेला स्वप्नच दाखवत नाही तर त्या स्वप्नांची पूर्तताही करून टाकतात. पाकिस्तानची अंतर्गत स्थिती आज अतिशय दयनीय अशी आहे. आर्थिकदृष्ट्या तो देश नुसता कर्जबाजारी झाला नाही तर दिवाळखोरीत निघाला आहे. कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत त्या देशात आनंदीआनंद आहे. लुटालूट मोठ्या प्रमाणात होत आहे. महागाई आकाशाला भिडली आहे. लोकांना खायला मिळत नाही. अन्नाच्या एका तुकड्यासाठी एक दुसऱ्याचा जीव घेतला जात आहे आणि पाकिस्तानी राज्यकर्ते मूर्खाच्या नंदनवनात वावरत आहे. जम्मू-काश्मिरातील राज्यकर्ते सुरुवातीपासूनच पाकिस्तानधार्जिणे होते. त्यांच्या या भूमिकेत अजूनही फारसा बदल झाल्याचे जाणवत नाही. राज्याचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी व्याप्त काश्मीर परत आणण्याच्या जयशंकर यांच्या घोषणेचे स्वागत केले असले, तरी त्यातून एकप्रकारे त्यांनी सरकारला आव्हान दिले आहे. व्याप्त काश्मीर परत घेण्याची सरकारची क्षमता असेल तर त्याने ते घेऊन टाकावे. आम्ही कुठे त्यांना रोखले आहे, असे उमर म्हणाले. जम्मू-काश्मीरचा एक हिस्सा जसा पाकिस्तानच्या ताब्यात आहे, तसाच दुसरा चीनच्या ताब्यात आहे, याकडे लक्ष वेधताना उमर अब्दुल्ला यांनी सरकार पाकिस्तानच्या ताब्यातील भारताच्या हिस्स्याबद्दल बोलते; मात्र चीनच्या ताब्यातील हिस्स्याबाबत बोलत नाही, असा टोलाही ते मारतात. हा भाग परत मिळविण्याची घोषणा ही राजकीय नाही तर राष्ट्रीय आहे. त्यामुळे या घोषणेचे कुणीही राजकारण करण्याचे, एक दुसऱ्यावर आरोप-प्रत्यारोप करण्याचे कारण नाही. अखंड भारताचे आमचे स्वप्न आहे. व्याप्त काश्मीर भारतात परत येणे हे त्या दिशेने टाकलेले एक पाऊल मानले जाईल, यात शंका नाही. जयशंकर यांच्या भूमिकेप्रमाणे मोदी यांनी व्याप्त काश्मीर भारतात सामील करूनच टाकावे, म्हणजे खऱ्या अर्थाने काश्मीरचा प्रश्न सुटणार आहे. या देशातील लोकांनी पाहिलेल्या आणखी एका स्वप्नाची पूर्तता होणार आहे.

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# राजकीय गुंडांचा बंदोबस्त...

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांच्या तावडीतून देशाला मुक्त करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले. मात्र केवळ मातृभूमीला स्वतंत्र करणे हा एवढाच हेतू नव्हता, तर स्वराज्याबरोबर सुराज्यही त्यांना स्थापन करायचे होते. म्हणूनच त्यांनी सरंजामशाही बंद केली. वतनदारी बंद केली. कारण वतनदारी आली की त्याबरोबर सरंजामशाहीदेखील येते. मग हे वतनदार आपापल्या विभागात स्वतःचं मोठं प्रस्थ निर्माण करतात आणि सुरू होतं अत्याचाराचं चक्र... आपलं प्रस्थ वाढवण्यासाठी त्यांना अनेक 'रॉबिनहुड' कार्यकर्ते लागतात. हे रॉबिनहुड वतनदारासोबत स्वतःचंही प्रस्थ वाढवत जातात. रॉबिनहुड संस्कृती म्हणजे एकाला लुटून स्वतःची तिजोरी भरायची आणि त्यातील थोडा भाग जनतेसाठी खर्च करतोय, असं दाखवायचं. जनतेसाठी खर्च केलेल्या भ्रष्टाचाराच्या, खुनाच्या पैशाचा इतका बोलबाला केला जातो की, या रॉबिनहुडला देव बनवलं जातं. ज्या वतनदारासाठी हे रॉबिनहुड काम करतात ते वतनदार देवांचेही देव असल्याचे भासवतात आणि इथूनच शोषणाची विकृत परंपरा सुरू होते. मोठमोठे बॅनर लावून हे स्वतःला समाजसेवक म्हणून समोर आणत असतात; मात्र करत असतात हे काळे धंदे, खंडणी, भ्रष्टाचार. वतनदार म्हणजेच आताचे आमदार, खासदार व मंत्री या रॉबिनहुडच्या जीवावर करत असतात. कधी कधी प्रकरण गळ्याशी येतं. म्हणून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी ही पद्धतच मोडून काढली होती.

सध्या महाराष्ट्रात राजकीय गुंडगिरीच्या ज्या बातम्या येत आहेत, त्या भयानक आहेत. जरी या विषयाची चर्चा होत असली, तरी हा विषय खूपच जुना आहे. असं म्हणतात ना पकडला जातो तो चोर. अशी कितीतरी प्रकरणे आहेत, जी दाबली गेली, समोर आलीच नाही. संतोष देशमुख यांचं प्रकरण समोर आल्याने राजकीय गुंडगिरीची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली. देशमुख यांना ज्या प्रकारे हालहाल करून मारलं, त्यावरून हे स्पष्ट होतं की, या राजकीय गुंडांना कायद्याची भीती वाटत नाही. त्यांचे वतनदार म्हणजे आमदार, खासदार, मंत्री त्यांना कोणत्याही गंभीर गुन्ह्यातून सोडवू शकतात, असा आत्मविश्वास त्यांना असतो. दिशा सालियन, सुशांत सिंह राजपूत, रमेश किणी, मनसुख हिरेन इत्यादी अनेक प्रकरणांचा व्यवस्थित छडा लागलेला नाही. ही न्यायप्रविष्ट प्रकरणे असल्याने यावर बोलूनही चालणार नाही. मात्र मुद्दा असा आहे की, राजकीय गुंड प्रचंड माजले आहेत. त्यांच्यावर असलेल्या राजकीय वरदहस्तामुळे ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. गल्लोगल्लीमध्ये तर असे अनेक गुंड मवाली असतात, ते छोट्या छोट्या विभागात आपलं प्रस्थ वाढवत असतात. एका रॉबिनहुडच्या हाताखाली असे अनेक 'मिनी रॉबिनहुड' तयार होत असतात. पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रेय गाडे हा देखील राजकीय पक्षाशी संबंधित आहे, असे बातम्यांतून कळले आहे. राजकीय पक्षाशी संबंध असणे म्हणजे गुन्हे करण्याची परवानगी मिळणे, असा चुकीचा अर्थ सध्या समाजात रुजवला जात आहे. जो अत्यंत चुकीचा आहे. त्यामुळे राजकीय गुंड आणि गल्लीछाप मवाल्यांचा कायदेशीर मार्गाने व्यवस्थित बंदोबस्त व्हायलाच हवा.



या मराठी मातीने जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणाऱ्या ज्ञानेश्वर माउलींपासून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांपासून हिंदू संघटक सावरकर यांच्यापर्यंत अनेक महापुरुषांना जन्म दिला आहे. या महापुरुषांचा आदर्श घेऊन आपण चाललो तर मराठी माणूस जगावर राज्य करू शकेल. या महापुरुषांचे आपल्यावर पुष्कळ उपकार आहेत. या महापुरुषांनी जे आभाळाएवढं काम करून ठेवलं आहे, ते इथे राजकीय गुंडगिरी पोसावी म्हणून नाही, तर महाराष्ट्राने देशाचे व पुढे जाऊन जगाचे नेतृत्व करावे म्हणून... आपण मराठी माणूस जर स्वतःला छत्रपती शिवाजी महाराजांचे वैचारिक वारसदार मानत असू तर आपली जबाबदारी वाढते. आपली वागणूक अशी असली पाहिजे की, जगाने आपला आदर्श घ्यावा आणि म्हणूनच ही राजकीय गुंडगिरी एक शाप म्हणून समोर येत आहे. त्याचबरोबर सोशल मीडियावर वावरणाऱ्या 'भावना दुखावल्या संघटनेच्या' स्वयंघोषित कार्यकर्त्यांकडेही प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे. हे लोक कोणालाही मारण्याच्या धमक्या देऊन सामाजिक वातावरण बिघडवत असतात. या अशा गुंडांचा बंदोबस्त करण्यासाठी कायदेशीर मार्गाने कठोर पावले उचलावी लागणार आहेत. सोशल मीडियावरही जरी कुणी हिंसक धमकी दिली तरी त्याच्यावर गंभीर गुन्हा दाखल व्हायला हवा तसेच राजकीय सरंजामशाही व रॉबिनहुड निर्माण होऊ नये म्हणून कोणत्याही आमदाराला व खासदाराला त्या मतदारसंघात दोन टर्मपेक्षा जास्त टर्म तिकीट देऊ नये. जर तिकीट द्यायचेच झाले तर लांबच्या मतदारसंघात देण्यात यावे. जेणेकडून तिथे त्यांचं राजकीय प्रस्थ निर्माण होणार नाही. राजकीय प्रस्थ ही वाईट घटना नाही, पण अनेक लोक याचा गैरफायदा घेतात आणि आपण कुणी राजे असल्यासारखे शोषण करायला मोकळे होतात. तसेच ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत त्यांना राजकारणातून हद्दपार केले पाहिजे. त्यांना राजकारणात असण्याचा कोणताच नैतिक अधिकार नाही. कारण या महाराष्ट्राने टिळकांसारखे लोकांसाठी झटणारे राजकारणी पाहिले आहेत. अशा महाराष्ट्राच्या राजकारणात गुंड-मवाल्यांची भरती करून आपण कोणता आदर्श निर्माण करत आहोत? आणि आपण कोणाचे भले करणार आहोत? एखाद्या राजकीय नेत्याने गंभीर गुन्हा केल्यास त्याला सामान्य गुन्हेगारापेक्षा कठोर शिक्षा व्हायला हवी. कारण लोकांचं रक्षण करणं, त्यांचं कल्याण करणं, न्याय करणं हे राजकारणी व मंत्र्यांचं काम असतं. मग त्यांनीच अन्याय केला तर असा अन्याय पुन्हा होऊ नये याचा आदर्श घालून देण्यासाठी अत्यंत कठोर कारवाई नको का करायला?

न्याय करण्यासाठी, महाराष्ट्रात रामराज्य आणण्यासाठी आपल्याला इथे तिथे पाहायची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आपल्या समोर आहे. 'हर हर महादेव'ची घोषणा करत या राजकीय गुंडांचा आणि गल्लीछाप मवाल्यांचा कायदेशीर मार्गाने कायमचा बंदोबस्त करायला हवा. जगाला हेवा वाटेल असा महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे आणि ही श्रींची इच्छा आहे!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# पोलिस ठाणे वाढविता, गोधन तस्करीचे काय?

कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी पोलिस खात्याची आहे. त्याकरिता पोलिस खाते सक्षम आहे. नव्हे, त्यांचा कारभार हा 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' असे ब्रिद स्वीकारून व्हावा, असेच अभिप्रेत आहे. पण प्रत्यक्षात कार्यरत अनेकांची मानसिकता काम न करण्याचीच आहे. यासंदर्भात कारणे शोधून प्रत्यक्षात उपाय करण्याची वेळ आलेली आहे. एक सांगतो, जे काही प्रामाणिक पोलिस आहेत म्हणूनच जनता सुरक्षित आहे. ही पोलिसांची जमेची बाजू असली, तरी इतरत्र हीच यंत्रणा अपयशी ठरत आहे. सतत वाढत असलेली लोकसंख्या पाहता पोलिस ठाण्यांची संख्या वाढविण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. परंतु पोलिस ठाणे वाढवून गोधनाची तस्करी, रेतीची तस्करी, घरफोड्यांचे वाढते प्रमाण थांबणार काय? सामान्यांच्या तक्रारींना झटपट न्याय मिळणार का? नागपूर जिल्ह्यात बाजारगाव, मोहपा, वडोदा, पाचगाव, नांद, कान्होलीबारा या नवीन पोलिस स्टेशनच्या निर्मितीचा प्रस्ताव आहे. त्याला मान्यता मिळाल्यास नागपूर ग्रामीणमध्ये २२ वरून २८ पोलिस स्टेशन होतील. भारतात १७,५३५ पोलिस स्टेशन आहेत. महाराष्ट्रात १,१६५ पोलिस स्टेशन आहेत. राज्यात सुमारे २,२९,९६२ कर्मचाऱ्यांच्या बळावर कामकाज सुरू आहे. ही सर्व पोलिस यंत्रणा रात्रंदिवस राबत असते, म्हणूनच १३ कोटी जनता सुरक्षितपणे आपल्या घरात झोपते, असेही म्हटल्यास वावगे होणार नाही. परंतु एक प्रश्न असा पडतो की, एवढी मोठी पोलिस यंत्रणा असताना गोधनाची तस्करी का वाढत आहे? याचे उत्तर शोधण्याचा विचार बहुतांश मंडळी करीत नसल्याने गाई नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. गोधनाची तस्करी रोखण्याची जबाबदारी केवळ पोलिसांवरच नाही, तर ती सामान्य गोपालकांसह शेतकऱ्यांवरही आहे. पण गोपालकांना आणि शेतकऱ्यांना आता गाई नकोशा झाल्या आहेत. कदाचित याच कारणाने ते सर्रास गाई कुणालाही विकत आहेत. जी मंडळी गाई विकत घेतात ते थेट त्यांना कत्तलखान्यात पाठवित आहेत. आता गाई कत्तलखान्यात पाठविणे हा फार मोठा गुन्हा आहे. हाच गुन्हा रोखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. हीच जबाबदारी पोलिस यंत्रणा इमानेइतबारे पार पाडत नसल्याने महाराष्ट्रातून आंध्रप्रदेशातील कत्तलखान्यांमध्ये गाई जाण्याचे प्रमाण मन सुन्न करणारे ठरले आहे. वस्तुतः महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदा अंमलात आला आहे. तरीही कायद्यातील पळवाटा आणि पोलिसांचा संपलेला धाक गोधनाच्या तस्करीसाठी कारणीभूत ठरला आहे. पूर्वी एक पोलिस गावात येताच संपूर्ण गावकरी घाबरायचे, एवढा धाक म्हणा किंवा आदरयुक्त भीती तेव्हा होती. कालांतराने ती प्रतिमा पुसल्या गेली आणि पोलिसांबद्दल नकारात्मक भावना वाढीस लागली. उरलीसुरली कसर भारतीय चित्रपटांनी पूर्ण केली. त्यांनी सतत विविध चित्रपटांचे कथानक रंगविताना पोलिसांबद्दल वाईटच गोष्टी दाखविणाऱ्यावर भर दिला. यातून पोलिसांबद्दल सर्वत्र नकारात्मक भावना वाढीस लागली. अनेकदा पोलिसही चुकीचे वागले. पण आता वेळ आलेली आहे की, त्यात बदल व्हायला हवेत. आज पोलिस खात्यात सुशिक्षितांची संख्या वायुवेगाने वाढली आहे. डॉक्टर, अभियंते, वकील या खात्याची शान वाढवित आहेत. पण ज्यांच्या बळावर काम करायचे, त्या खालच्या पातळीवरील पोलिस कर्मचाऱ्यांची काम करण्याची मानसिकता संपलेली आहे. ते तासन्‌तास मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकलेले असतात. आता मोबाईलमध्ये गुंतलेले कर्मचारी कसे काय आपल्या कामाला न्याय देतील? केवळ पोलिस ठाण्यांची संख्या वाढवून कायदा सुव्यवस्था अबाधित राहणार नाही. याकरिता खात्यात कार्यरत मनुष्यबळाची मानसिकताही बदलविण्याची गरज आहे. खाते कुठलेही असो, ठरावीक तास काम करणे हा झाला कायदा. पण कामात स्वतःला झोकून देणे ही झाली नैतिकता. मी पगार घेतो म्हणून काम करतो. हा झाला व्यवहार. खात्याच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची योग्य काळजी घेण्याचे कार्य मला पार पाडावयाचे आहे, ही आपुलकी तर बहुतांश कर्मचारी विसरले आहेत. समजा त्या सर्व कर्मचाऱ्यांनी स्वतःला झोकून त्यांच्या वाट्याला आलेले काम प्रामाणिकतेने केले तर पोलिस ठाणे वाढविण्याची गरज भासणार नाही. जे आहे त्यातच उत्कृष्ट काम होईल अन्‌ गुन्हेगार तस्करी सोडून प्रवचन ऐकतील, एवढी ताकद पोलिसांमध्ये आहे. तेव्हा तीच पोलिसांमध्ये दडलेली शक्ती जागृत करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, हीच माफक अपेक्षा.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

# मर्यादेत राहा...

गावाकडे असलेल्या वडाखालच्या कट्ट्यावर बसून काही रिकामचोट लोकं जागतिक घडामोडींवर चर्चा करत असतात. नव्हे तर, देशाच्या पंतप्रधानांना किंवा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना सल्ले देण्याचं कामंही या कट्ट्यावरून चालते. बरं ही मंडळी कोण तर, हाताला काम धंदा नसलेली वेळ घालविण्यासाठी पारावर बसणारी टवाळी करणारी, गावात, गल्लीत कुत्रंदेखील विचारत नाही अशी मंडळी होय. अशीच काहीशी अवस्था आजच्या राजकारणात, महाराष्ट्रात आणि मुंबईत ज्याची होऊन बसली आहे. त्यांना लोकं 'शिल्लक शिल्लक' असे म्हणून टिंगल उडवतात, मजा घेताना दिसतात. मात्र, यांची थोडीथोडकीदेखील अब्रू शिल्लक नसून यांची शिल्लकच शून्य आहे. त्यामुळे ज्यांची स्वतःची लायकी काही नाही, अशा व्यक्ती जगातल्या सर्वात मोठ्या संघटनेवर, त्या संघटनेच्या महत्त्वाच्या पदांवर राहिलेल्या व्यक्तींवर वारंवार बोलताना दिसत आहेत. त्यांनी आपली पायरी ओळखून राहिलं पाहिजे, एवढी माफक अपेक्षा या महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता, मराठी माणूस आणि हिंदू समाजाची आहे.

जगात सर्वात मोठी एकमेव संघटना असलेल्या, अर्थात या संघटनेच्या अर्ध्यावरतीदेखील कोणीही पोहोचू शकलेले नाही. एवढं मोठं अतिविराट रूप असलेल्या संघटनेवर किंवा त्या संघटनेच्या दुसऱ्या सर्वोच्च पदावर राहिलेल्या व्यक्तीवर बोलणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. हे वेगळ्याने सांगण्याची गरज नाही. यांची उंची किती, औकात किती आणि हे बोलतात किती... लायकीत राहायचं सोडून चर्चेत राहण्यासाठी मोठमोठ्या व्यक्तींवर टीका करायची ही यांची 'मोडस ऑपरेंडी' झाली आहे. कदाचित सकाळचा भोंगा यांनी त्यासाठीच ठेवला आहे.

बरं, मराठी मराठी करून गळे काढणाऱ्या या लोकांनी आपल्या मुलांना कुठं शिकवलं? स्कॉटिश ख्रिश्चन मिशनऱ्यांद्वारे माहिम येथे चालविल्या जाणाऱ्या बॉम्बे स्कॉटिश स्कूल आणि खाजगी कॅथलिक महाविद्यालय सेंट झेवियर्स येथे... मराठी भाषेचा पुळका येणाऱ्या या लोकांना महानगर पालिकेच्या किंवा सरकारी मराठी शाळा यांचे मुलं शिकवायला मिळाल्या



नाहीत? २०१४ मध्ये मुंबई महानगर पालिका मराठी माध्यमाच्या ३६८ शाळा चालवत होती. आता २०२४ या वर्षात शाळांची संख्या २६२ वर आली होती. १० वर्षांत १०० शाळा बंद झाल्या आहेत. मुंबई महापालिकेने एक 'युनिफाईड डिस्ट्रिक्ट इनफॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन' (यूडीआयएसई) कडे शाळांची माहिती संकलित करून दिली.

या आकडेवारीतून मागच्या दशकभरातील मराठी माध्यमांच्या शाळांची दुर्दशा आणि गळती समोर आली आहे. मुंबई महापालिकेत तब्बल २५ वर्षे याच मराठी मराठी म्हणून गळे काढणाऱ्यांची होती. या २५ वर्षांतल्या १० वर्षांमध्ये १०० मराठी शाळा बंद पडल्या. तेव्हा यांना आपली मराठी शाळा बंद कशी होऊ शकते, असा प्रश्न पडला नाही. त्यासाठी प्रयत्न करावे असे वाटले नाही. तेव्हा आपलेच महापौर, शिक्षण सभापती असताना, त्यांचे कान उपटावेसे यांना वाटले नाही? महानगर पालिकेवर यांचंच राज्य होतं ना... राज्य असताना मराठी माणूस मुंबईबाहेर कसा फेकला गेला?, मुख्यमंत्री असताना गिरणी कामगारांना हक्काची घरं का दिली नाही?, पत्राचाळीतील ६०० हून अधिक कुटुंबांना घरं देऊन न्याय का दिला नाही?, या घोटाळ्यातील आरोपी तुझा माणूस निघाला, मराठी माणसांवर अन्याय करणाऱ्या या माणसाला पक्षाबाहेर का काढले नाही? केवळ मराठी मराठी म्हणून चालत नाही. त्याच्यासाठी काही करावं देखील लागतं. मराठी माणसांसाठी काय केलं जरा एक काम सांगावं यांनी. मुंबई महापालिकेत सत्ता मिळविण्यासाठी मराठी-अमराठी वाद तुम्ही निर्माण केला. मात्र, त्याच अर्थात तुम्हाला मतदान करणाऱ्या मराठी माणसाला मुंबईबाहेर जावे लागले तेव्हा तुम्ही झोपला होतात?

हिंदुत्ववादी संघटना आणि त्याच्या नेत्यांवर बोलायला तत्परता दाखविणाऱ्या साहेबांची, अबू आझमी बोलला तेव्हा तत्परता कुठे गेली होती? वक्फ बोर्डाच्या कायद्यातील सुधारणेला विरोध करतो, मुख्यमंत्री असताना औरंगजेबाच्या मजारीचं नूतनीकरण झालं, अजान पठनाची स्पर्धा तू भरवलीस, ऊर्दूत कॅलेंडर तू छापलीस, हिंदुहृदयसम्राटाचा जनाब तू केला, तेव्हा आमच्या मायमराठीचा अवमान झाला नाही? केवळ एखाद्यानं वेगळ्या उद्देशानं दिलेल्या उदाहरणानं मराठीचा अवमान होतो, नाही का? बरं, तुझं कुटुंब मध्यप्रदेशातून स्थलांतरित झालेलं आहे, हे दिग्विजय सिंगांचं वक्तव्य का खोडून काढलं नाहीस... एका मराठी माणसाला तो माणूस हिंदी असल्याचं म्हणत होता. त्याचा निषेध तर सोडा साधी प्रतिक्रिया दिली नाही आणि आमच्या मराठी माणसावर प्रतिक्रिया द्यायला सरसावतो, हे तुझं जे काही वेगळं मराठीत्व आणि वेगळं हिंदुत्व आहे ना ते सगळ्यांना कळलं आहे. त्यामुळेच तर विधानसभेत लायकी दाखविली या मराठी माणसाने तुम्हाला.

गुरुवारी विधान परिषदेत एका नेत्यानं स्वतःच्या डिंगा हाकताना, संभाजी महाराजांची तुलना स्वतःसोबत केली. तेव्हा बरा मूग गिळून बसलास. 'आज के शिवाजी नरेंद्र मोदी' पुस्तकाचे अनावरण झाले तेव्हा तर थय्या थय्या नाचला होतास ना... आता काय झालं? तुमच्या सडलेल्या मेंदूचे ऑपरेशन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत राज्यात वैचारिक भाषेची सभ्यता आणि 'हेल्दी पॉलिटिक्स' या महाराष्ट्रात बघायला मिळणार नाही.

तुम्ही मराठी माणसांची, मराठी भाषेची चिंता करण्यापेक्षा स्वतःच्या राजकीय भवितव्याची चिंता करणे गरजेचं आहे. आजची तुमची गरज ती आहे. उगाच कशाला उसने अवसान आणताहेत. मांजर डोळे मिटून दूध पीत असली तरी जगाला कळते, काय काय सोंगं चालू आहेत तुमची ती. जनतेला दूधखुळी समजू नका आणि मर्यादेत राहा...

९२७०३३३८८६


### युवकांनो, आव्हानांना सामोरे जा...!

देशातील युवक-युवती उद्याचे खरे आधारस्तंभ असणार आहेत. या युवा शक्तीच्या जोरावर उद्या आपला देश जगातील सर्वशक्तिमान देश ठरावा म्हणून युवा वर्गाने आजच्या या परिस्थितीने गोंधळून न जाता, या विपरीत परिस्थितीने अस्वस्थ न होता किंवा हताश-निराश न होता या परिस्थितीला आत्मविश्वास, धाडस व शौर्याने सामोरे जाण्याची गरज आहे. आजचा युवा वर्ग हा उच्चविद्याविभूषित आहे. त्यांच्याकडे विविध क्षेत्रातील कौशल्य आहे, कला आहे, धाडस आहे. मात्र आजची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील, कौटुंबिक क्षेत्रातील ढासळत असलेली नैतिकता, मानवी मूल्यांची पायदळी तुडवणूक, अनादरता, राजकीय क्षेत्रातील मक्तेदारी व घराणेशाही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या सर्व बाबींचा परिणाम आजच्या युवा पिढीवर होत आहे. देशातील विविध क्षेत्रात वाढत असलेला भ्रष्टाचार, वाढती बेरोजगारी, वाढती व्यसनाधीनता, शासनाची आणि समाजाची उदासीनता याचा परिणाम युवकांच्या मानसिकतेवर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे आजचा युवा वर्ग हा वैफल्यग्रस्त दिसत आहे. मात्र देशातील तमाम युवकांनी या परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळगावे, मनी आत्मविश्वास बाळगावा व आज ना उद्या ही परिस्थिती बदलले याबाबत निश्चिंत राहावे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

••••

### वाढते तापमान आणि पाणी समस्या



वर्षभर पाण्याचे स्रोत कायम ठेवत असलेले नदी, नाले, तलाव, विहिरी तापमान वाढताच पाण्याची पातळी झपाट्याने कमी होऊन आटू लागली आहेत. तापमान वाढत आहे, तसे सिंचित पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. एरवी बाराही महिने पाण्याचे सिंचन स्रोत असलेली साधने आता आटू लागली आहेत. नदी, नाले, तलाव, विहिरींना वर्षभर पुरेल एवढं पाणी साठवले असायचे. परंतु तापमान वाढताच पाण्याची पातळी झपाट्याने कमी होते आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात पाण्याची समस्या भीषण होऊ शकते. सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी शासनाने जलसिंचन क्षेत्रात वाढ केली असली तरी ही पाण्याची पातळी खाली होते आहे. शहर, ग्रामीण भागात पाण्याची समस्या निर्माण होण्याअगोदर उपाययोजना आखल्या पाहिजेत. त्यामुळे पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

••••

## वाचक पत्रे

### पोलिस आयुक्तांचे अभिनंदन

मागील नऊ महिन्यांपासून 'ऑपरेशन थंडर' ही मोहीम राबविणारे नागपूरचे पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांचा नशामुक्त शहर बनविण्याचा संकल्प अभिनंदनीय आहे. सततच्या व्यसनामुळे मानवाच्या शरीराचा नाश होतो. कुटुंब उद्ध्वस्त होते, मुलांचे छत्र हरवते. पर्यायाने समाज, शहर आणि देशाची प्रगती खुंटते. याकरिता पोलिस आयुक्तांनी नशामुक्तीचा पाठपुरावा करून अमली पदार्थांची तस्करी, खरेदी विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. एकदा व्यक्ती नशेच्या आहारी गेल्यावर त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. ही साखळी तोडण्याचे काम ते करीत आहेत. यासाठी त्यांनी या मोहिमेची जनजागृती करून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे तसेच ही मोहीम निरंतर चालविण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास त्यांनी दिला आहे. आपण नागरिकांनी सहकार्य केल्यास ही मोहीम नक्कीच यशस्वी होईल त्यासाठी आपणही कटिबद्ध होऊ या.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

••••

### औरंगजेबाची पिलावळ...

फाळणी हा भारताला मिळालेला शाप आहे. 'एक ना धड घरभर चिंध्या' अशा स्वरूपात सगळीकडे औरंगजेबी मानसिकतेच्या चिंध्या अजूनही पसरल्या आहेत. सगळे तसे नसतीलही, परंतु बरेचसे तसेच दिसतात. एरव्ही अल्पसंख्यकांच्या एकाही मिरवणुकीत मग ती लग्नाची का असेना, दगडफेक झालेली बातमी मी तर कधी वाचली नाही. परंतु श्रीराम शोभायात्रा, हनुमान जयंती, दुर्गापूजा वगैरे धार्मिकतेच्या वेळी नेमकी दगडफेक कशी होते? आधीच व्यवस्था कशी झाली असते? एका आवाहनावर शेकडो रिकामटवळे कसे एकत्र होतात? म्हणजेच शरीराने इथे राहणारे काही अब्बा मनाने औरंगजेबाच्याच प्रेरणेने जगत आहे असे वाटते. दुर्दैव असे की, समाजवादी, काँग्रेससारखे पक्ष तर आता उघडपणे अल्पसंख्यक पक्ष झाला आहे. त्यांना जनता तसेच 'अल्पसंख्य' जागा देतात हा भाग वेगळा. परंतु जर कधी सत्तापरिवर्तन झाले तर अशा औरंगजेबी वृत्तीच्या लोकांना तर आयतं फावेल. किती मस्ती करतील हे त्यावेळी. अबू आझमी हा काही आज बोलला नाही. तो जन्मल्यापासूनच वादग्रस्त राहिला असेल. आपला मतदार तयार करायचा, विशिष्ट एरिया बनवायचा आणि एक विधानसभा करून वारंवार निवडून यायचे, असेच धंदे या लोकांनी इथे सुरू केले आहे. तिकडे ओवेसी आपल्या बापजादापासून ४० वर्षांपासून एकाच ठिकाणी सत्तेत आहे. तेथेच घरावर घर चढवून आपले मतदार वाढविले आहे. नागपुरातही नवेनवे चेहरे दिसतात. ते कुठे राहतात, काय करतात हे पोलिस विभागाला तरी माहीत आहे का कोण जाणे. अशा औरंगजेबी वृत्तींना वेळीच ठेचलेले बरे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# रामकाल पथ प्रकल्प अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील सीताखांडी व उनकेश्वर क्षेत्र जोडण्यात यावेत : आ. हेमंत पाटील

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ मार्च**

नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाप्रमाणे प्रभू श्री रामचंद्रांच्या ज्या- ज्या ठिकाणी पाऊलखुणा आहेत ती ठिकाणे जोडण्यात येणार आहेत त्या रामकाल पथ प्रकल्प अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील सीताखांडी आणि किनवट तालुक्यातील गरम पाण्याचे झरे असलेले उनेकश्वर या तीर्थ क्षेत्राचा समावेश करण्यात यावा अशी मागणी आमदार हेमंत पाटील यांनी विधान परिषदेमध्ये केली.

भाविक भक्तांना राज्यातील देवस्थानाचे दर्शन सुलभरीत्या करता यावे यासाठी महायुती सरकारच्या काळात दळणवळणाच्या उत्तम सुविधा होत असून याकरिता महामार्गाची निर्मिती व पूर्वीच्या रस्त्यामध्ये सुधारणा करण्यात येत आहेत. तसेच तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत देशातील महत्वाचे १३९ तीर्थ क्षेत्र विनामूल्य दाखविण्यात येणार आहेत. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाने तर राज्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देण्याचे काम केले आहे. कमीत कमी वेळेत नागपूर - मुंबई जाण्याची व्यवस्था झाली आहे. त्यानंतर राज्यातील सर्व प्रमुख देवस्थान जोडण्याचा सुद्धा मानस राज्य शासनाचा असून त्याअनुषंगाने शक्तीपीठ महामार्गाअंतर्गत कोल्हापूर-तुळजापूर-माहूर-औंढा नागनाथ - परळी वैजनाथ यासह अनेक तीर्थ क्षेत्र जोडण्यात येणार आहेत. त्याच



धर्तीवर प्रभू श्री रामचंद्रांच्या पाऊलखुणा असलेली ठिकाणे सुद्धा रामकाल पथ प्रकल्प अंतर्गत जोडण्यात येणार आहेत . त्यामुळे या अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील सीताखांडी येथे सीतामातेने स्नान केले होते त्यासोबतच याठिकाणाला हे वैज्ञानिकदृष्ट्या सुद्धा महत्व आहे. आणि किनवट तालुक्यातील उनकेश्वर आहे याठिकाणाचा उल्लेख असल्याचे आढळते वाल्मिकी रामायणातील तेराव्या अध्यायानुसार शारभांग ऋषी उनकेश्वर येथे तपस्येला बसले होते. शारभांग ऋषी त्वचा रोगाने ग्रस्त होते. त्यांच्या तपस्येला प्रसन्न होऊन भगवान श्रीराम सीता व लक्ष्मणसह उनकेश्वरला आले. त्यांनी शारभांग ऋषीची सेवा करण्यासाठी अग्निबाण मारला. अग्निबाणाने गरम पाण्याचा झरा तयार झाला. असे सांगण्यात येते. त्यामुळे या ठिकाणास विशेष महत्व प्राप्त झाले आहे . त्यामुळे या दोन ठिकाणाचा रामकाल पथ प्रकल्प अंतर्गत समावेश करावा . जेणेकरून याभागात पर्यटन वाढीस चालना मिळेल आणि या भागातील लोकांना हाताला काम मिळेल कारण मराठवाडा हा पूर्वी पासून मागास भाग असल्याने उद्योग व्यवसायाची म्हणावी तशी भरभराट झाली नाही . माहूरची रेणुकामाता आणि औंढा नागनाथचे ज्योतिर्लिंग या तीर्थ क्षेत्राच्या पर्यटन विकासाला चालना दिल्यास नक्कीच या भागात भरभराट होईल असेही आमदार हेमंत पाटील म्हणाले.

# महिलांनीच महिलांची साथ देणे आवश्यक : मिनल करनवाल




**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ मार्च**

महिलांचे स्वतंत्र अस्तित्व घराघरातून निर्माण करण्यासाठी बालिका पंचायत हा उपक्रम पथदर्शी ठरत आहे. या उपक्रमाला सुरूवात केल्यानंतर जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींनी याचे स्वागत केले आहे. आता दुसऱ्या टप्प्यात अनेक गावांचा आम्ही समावेश केला असून या माध्यमातून महिला सबळीकरणाची मोहिम मोठ्या प्रमाणात राबविली जाते. समाजाची मानसिकता बदलविण्यासाठी महिलांच्या या उपक्रमाला घराघरातील महिलांचा पाठिंबा वाढणे आवश्यक असल्याचे, प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त आज नांदेड येथे जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभाग व स्वच्छता विभागाच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीण घुले, महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे यांची मंचावर उपस्थित होती.

प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी बालिका पंचायत उपक्रमाच्या दुसऱ्या टप्पाचा शुभारंभ करण्यात आला. यात नव्याने २११ गावांमधून बालिका पंचायत उपक्रम राबवला जाणार आहे.

यापूर्वी जिल्हा परिषदेने या उपक्रमामार्फत गावागावात स्वच्छता मोहीम, दारूबंदी, वृक्षारोपन, शाळांचे बळकटीकरण, शासनाच्या योजनांची अंमलबजावणी, ग्रामपंचायत प्रशासनात मदत अशा अनेक उपक्रमांना राबविले आहे. आज बालिका पंचायत १.० मध्ये काम केलेल्या मुलींनी आपल्या कुटुंबासह या कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती. तसेच याठिकाणी अनेक गावांचे सरपंच या उपक्रमात सहभागी, गावातील शाळांचे शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामपंचायत अधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विशेष म्हणजे महिला सरपंचही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**काय आहे बालिका पंचायत**

केंद्र शासनाने महिलांच्या प्रतिनिधित्वासाठी आरक्षणाची घोषणा केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये यापूर्वीच महिलांना आरक्षण आहे. मात्र हे प्रतिनिधित्व करत असतांना महिलांमध्ये आपल्या पंचायतराज समितीच्या कारभाराची माहिती असावी. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद ते संसद सभागृहापर्यंत महिला प्रतिनिधित्व व त्याचे दायित्व याबद्दलची माहिती मिळावी. गावातील प्रशासन व्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढावा. त्यांच्या नेतृत्व गुणात वाढ व्हावी, महिला नेतृत्वाला पुढाकार मिळावा यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. सिईओ मिनल करनवाल यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून नांदेड जिल्ह्यात त्याला गेल्यावर्षी प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षपदी चिंतावार तर सचिवपदी बरकमकर

**भोकर -** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे,प्रदेश संपर्कप्रमुख वैभवजी स्वामी,प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे,प्रदेश उपाध्यक्ष अशोकजी देडे,अभय कुमार दांडगे,विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्या आदेशान्वये नांदेड जिल्हाकार्यकारिणीने भोकर तालुका शाखेच्या उज्वल कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षपदी विजयकुमार चिंतावार, कार्याध्यक्षपदी सारंग मुंडदा व सचिव पदी कमलाकर बरकमकर यांची फेरनियुक्ती केली असल्याची घोषणा करून नियुक्तीपत्र भोकर येथे झालेल्या बैठकीत दिले. दि.५ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अभयकुमार दांडगे यांच्या उपस्थितीत भोकर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्यालयात सर्व तालुका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.या बैठकीत नुतन कार्यकारणीची फेर नीवड करण्यात आली असून तालुकाध्यक्षपदी विजयकुमार चिंतावार,कार्याध्यक्ष पदी सारंग मुंदडा तर सचिव पदी कमलाकर बरकमकर यांची एकमताने फेरनिवड निवड करण्यात आली.सदर निवडिचे पत्र महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत मुळे व जिल्हा उपाध्यक्ष बालाजीराव नार्लेवाड यांच्या हस्ते झालेल्या बैठकीत देण्यात आले.कार्यकारिणीच्या इतर पदांवर निवड झालेल्या सदस्यांची नावे खालील प्रमाणे उपाध्यक्ष राजेश चंद्रे,विठ्ठल सुर्लेकर,कोषाध्यक्ष रमाकांत जोशी, सल्लागार सुधांशू कांबळे, संघटक शुभम नर्तावार, सहसल्लागार संदेश कांबळे आदींची एकमताने फेर निवड करण्यात आली.या झालेल्या निवडी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### मुगट येथील माधव राऊत यांची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी केली लंपास

**नांदेड-** मुदखेड तालुक्यातील मुगट गावातून अज्ञात चोरट्यांनी दुचाकी केली लंपास दुचाकी मालकाने अज्ञात चोरट्याविरोधात मुदखेड पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.मुगट गावातील रहिवाशी माधव आनंदराव राऊत हे नेहमी प्रमाणे आपली पान टपरी बंद करून घरि आले आणि त्यांनी आपली दुचाकी स्प्लेंडर प्लस कंपनीची एम.एच.२६ सी.एल.५९६३ क्रमांकाची गाडी आपल्या घरासमोर दि.१७ फेब्रुवारी रोजी रात्री १०:०० वाजता लावली होती. ती गाडी दि.१७ फेब्रुवारी रात्रीच्या दरम्यान घरासमोरून अज्ञात चोरट्यांकडून चोरीला गेली असल्याची तक्रार माधव राऊत यांनी मुदखेड पोलीस ठाण्यात दिली आहे. बऱ्याच दिवसापासून दुचाकी चोरीचे प्रमाण कमी झाले होते परंतु आता दुचाकी चोरट्याने तोंड वर काढले असल्याचे दिसून येत आहे. आता पुन्हा एकदा तालुक्यात भीतीचे वातावरन निर्माण झाले आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने गार्भीय लक्षात घेऊन दुचाकी चोरट्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर कारवाई करावे अशी मागणी होत आहे.

### संघटनात्मकपर्व अंतर्गत आज भाजपाची किनवट येथे तातडीची बैठक

**किनवट-**भारतीय जनता पार्टी किनवट माहूर च्या वतीने संघटनात्मकपर्व अंतर्गत विधानसभेतील सदस्य नोंदणी, सक्रिय सदस्य नोंदणीचा आढावा घेण्याच्या दृष्टिकोनातून तसेच भविष्यातील पार्टीच्या संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने आमदार भीमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ मार्च २०२५ रोजी गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात तातडीची बैठक आयोजित केली असून या बैठकीला अ‍ॅड. किशोर देशमुख, सक्रिय सदस्य नोंदणी अभियानचे प्रभारी चैतन्यबापू देशमुख, जिल्हा संयोजक संदीप केंद्रे हे उपस्थित राहणार आहेत. या बैठकीस सदस्य नोंदणीचा आढावा घेतला जाणार आहे.त्यामुळे किनवट व माहूर तालुक्यातील भाजपाचे सर्व प्रमुख पदाधिकारी मोर्चे, आघाड्यांचे प्रमुख,शक्ती केंद्रप्रमुख, बुथप्रमुख व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### महेबूब लदाफ यांना वन विभागाचीमदत

**लोहा-**पिसाळलेल्या वानराने केलेल्या हल्यात महेबूब अहमद लदाफ गंभीर जखमी झाले होते. नुकतेच तहसिल कार्यालयात वन विभागाच्या वतीने आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते ६७ हजार रुपयांचा धनादेश देऊन मदत करण्यात आली. यावेळी प्रविण पाटील चिखलीकर, उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार विठ्ठल परळीकर, वन विभागाचे अधिकारी कॅंदरवाड, वनरक्षक परमेश्वर घुगे, शेवडीकर, केशव वाबळे, सहाय्यक वनसंरक्षक भीमसिंह ठाकूर , वनपरिक्षेत्र अधिकारी , संदीप शिंदे , परिमंडळ वन अधिकारी हगदळे, वनरक्षक परमेश्वर रामदास घुगे आदी उपस्थित होते.

# माहूर तालुक्यात १३ मार्चपर्यंत ग्रीस्टॅक नोंदणी सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**माहुर,दि. ०८ मार्च**

शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी तंत्रज्ञानाच्या मदतीने कृषि क्षेत्रात डिजीटल क्रांती घडविण्यासाठी शासनाने ग्रीस्टॅक योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीची सुरवात झाली असून तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण करण्यासाठी ०८ ते १३ मार्च २०२५ या कालावधीत ग्रीस्टॅक विशेष नोंदणी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रीस्टॅक नोंदणी मोफत असून शेतकऱ्यांनी या योजनेअंतर्गत नोंदणी करावी, असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.



या सप्ताहात प्रत्येक गावात नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. महसूल, कृषी व जिल्हा परिषद (ग्राम पंचायत ) यांचे संयुक्त पथक गावनिहाय गठीत करण्यात आले आहे. नोंदणी करण्यासाठी आधारकार्ड, आधारलिंक असलेला मोबाईल क्रमांक, सातबारा उतारा ( जमीनीचा दाखला) घेऊन शेतकऱ्यांनी सीएससी सेंटर ( कॉमन सर्व्हिस सेंटर) च्या सहकार्याने आपली नोंदणी पूर्ण करावी.ग्रीस्टॅक नोंदणीमुळे विविध सरकारी अनुदान व आर्थिक मदत जसे पीएम किसान सन्मान निधी होणार थेट बँक खात्यात जमा होणार,पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी अनावश्यक कागदपत्रे नाही लागणार, पीककर्ज जलद गतीने मंजुरी होणार आहे, खते, बियाणे व औषधांसाठी अनुदान सुलभतेने मिळणार, असे विविध फायदे मिळणार आहेत.

# महिलांनो न घाबरता मोठी स्वप्ने पहा,यश तूमच्या हातात आहे: अंजलीताई देशपांडे

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. ०८ मार्च**

चूल व मूल यात अडकून न बसता ,न घाबरता मोठी स्वप्ने पहा यश तूमच्याच हातात आहे असे मत बा-हाळी च्या सरपंच सौ.अंजलीताई राजन देशपांडे यांनी जागतिक महिला दिनानिमित्त शूभेच्छा देतांना व्यक्त केले.

जागतिक महिला दिनानिमित्त बा-हाळी ग्राम पंचायतीच्या सरपंच सौ.अंजलीताई राजन देशपांडे यांनी उपस्थित महिलांना पूष्पगूच्छ व पूस्तके देत सन्मान केला .या वेळी त्या म्हणाल्या की, महिलांनी रुढी परंपरा ,चूल व मूल अंधश्रद्धा याचे जोखड फेकून देत स्वतः सह परीवाराच्या प्रगतीत हातभार लावला पाहिजे. महिला देशाच्या पंतप्रधान, राष्ट्रपती, मूख्यमंत्री राज्यपाल यासह मंत्रीमंडळात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विविध क्षेत्रात महिला या आघाडीवर आहेत ,राजकारण,खेळ,



समाजकारण, संरक्षण दल,विविध प्रकारचे उद्योग, वैज्ञानिक ,वैद्यकीय सेवा बजावत आहेत. महिलांनी आपल्या मनात आत्मसंन्मान जागवला पाहिजे यातून आपले कूटूंब,गाव,शहर ,राज्य व देश सूधारण्यात व प्रगतीत ५० टक्के वाटा उचलण्याचे आवाहन केले.

# ब्रह्माकुमारीज उप सेवा केंद्राच्या वतीने उमरज मठ संस्थान येथे सात दिवसीय ईश्वरीय अध्यात्मिक शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०८ मार्च**

ब्रह्माकुमारीज उप सेवाकेंद्र कंधार निमित्त उमरज मठ संस्थान (धाकटे पंढरपूर ) येथे सात दिवसीय महायज्ञ कलशारोहण विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने ब्रह्माकुमारीज उप सेवाकेंद्र कंधार च्या वतिने संचालिका बीके ज्योती बहेनजी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सात दिवसीय अध्यात्मिक शिव चित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.

भव्य शिवलिंगाचे पुजन महंत श्री.एकनाथ महाराज - मठाधिपती उमरज मठ संस्थान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ब्रह्माकुमारीज कैलास नगर, नांदेड सेवा केंद्र संचालिका आदरणीय शिवकन्या बहिणजी, बी के बालाजी भाई, ब्रह्माकुमारी ज्योती बहेनजी (कंधार), यशोदा बहन, शिल्पा बहन,



यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

याप्रसंगी भव्य शिवलिंग दर्शन व ईश्वरीय अध्यात्मिक प्रदर्शनीचा हजारो भाविक भक्त, बंधु-भगिनींनी यांचा लाभ घेतला. . यावेळी अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी प्रतिभाताई चिखलीकर, माजी नगराध्यक्ष शोभाताई नळगे, एसडीएम सौ. संगेवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलपत्रेवार सर, पीएसआय गोंड सर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बोंबले सर, पत्रकार डॉ. गंगाधर तोगरे ,विनोद पाटिल तोरणे , माधवराव भालेराव मोहम्मद सिकंदर यांनी अध्यात्मिक ज्ञानाचे अवलोकन करुन भविष्य कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या सात दिवसीय प्रदर्शनीच्या यशस्वीतेसाठी बीके सतीश भाई, श्रीकांत भाई, श्याम भाई, गजानन भाई, दशरथ भाई, उदगीरे भाई, शंकर भाई, थोटे भाई, ज्ञानोबा भाई, पुजारी भाई, महादापुरे भाई, कामाजी भाई व बीके सिमा बहेन, मयुरी बहेन, नंदिनी बहेन, भार्गवी आणि निकम माता, डॉ. डांगे माता, बामने माता, नरंगले माता, रहाटकर माता, उदगीरे माता, नाक्कावार माता, डोंगरगे माता इत्यादींनी अथक परिश्रम घेतले. सात दिवसीय अध्यात्मिक ईश्वरीय ज्ञानाची सांगता ईश्वरीय मेडीटेशन करून प्रसाद वाटपाने करण्यात आली.

# ज्ञानमाता विद्याविहारच्या कारभाराची चौकशी करा

## भाजपाचे गुरुदीपसिंघ संधू यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०८ मार्च**

शहरातील नामांकित असलेली अल्पसंख्याक शाळा दर्जा असलेल्या ज्ञानमाता विद्याविहार शाळेमध्ये एका अल्पवयीन बालकावर शाळेतील कर्मचाऱ्यांवर लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकारामुळे शाळेतील अनागोंदी उघड होत आहेत त्यामुळे ज्ञानमाता शाळेच्या हिटलरशाही व जातीवादी प्रकारांची चौकशी करून सदर शाळेची मान्यता रद्द करावी अशी मागणी भारतीय जनता पक्ष अल्पसंख्याक मोर्चाचे मराठवाडा विभाग प्रमुख गुरदिपसिघ संधू यांनी नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मदर टेरेसा मिशन संस्थेअंतर्गत नांदेड शहरामध्ये कामठा खुर्द परिसरात ज्ञानमाता विद्याविहार इंग्रजी माध्यमाची शाळा मागील तीस वर्षापासून सुरू आहे. सदर शाळा अल्पसंख्याक दर्जा असून या शाळेमध्ये इतर समाजातील विद्यार्थी देखील मोठ्या संख्येने भरमसाठ फिस घेऊन शिक्षण घेतात. ज्ञानमाता विद्या विहार शाळेमध्ये दिनांक ०६ मार्च २०२५ रोजी शाळेतील एका १० वर्षीय बालकावर शाळेतील कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

ज्ञानमाता विद्याविहार शाळेमध्ये जातिवाद व धर्मद्वेशी शिक्षण राबविण्यात येत असल्याच्या तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक पिळवणूक केलेल्या शेकडो तक्रारी शिक्षणाधिकारी यांचेकडे प्रलंबित आहेत. त्यामुळे या शाळेच्या कारभाराची चौकशी करून सीबीएससी नियमाप्रमाणे शाळा चालू आहे का ? त्याप्रमाणे फी आकारली जाते का ? डोनेशनच्या नावाने आर्थिक पिळवणूक होते का ? शासनाचे नियमाप्रमाणे ऑडिट झाले का ? शाळेतील सीबीएससीच्या दहावी वर्गात प्रवेशाच्या नावाने नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक नाकारले जाते असा आरोप निवेदनकर्ते गुरदिपसिंघ संधू यांनी केला आहे. त्यामुळे या बाबीची चौकशी करून संबंधित शाळेची मान्यता रद्द करून संस्था चालकांवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# फिर्याद घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलिस निरीक्षकांची बदली करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०८ मार्च**

अपघात करुन पळुन जाणाऱ्या वाहनाला ग्रामिण पोलिसाच्या ताब्यात दिल्यानंतर त्या वाहनचालकस व वाहनास लगेच सोडुन देण्यात आले. त्यामुळे फिर्याद न घेणारे पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांची बदली करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख उध्दव शिंदे व माजी जिल्हा परीषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड ग्रामिण पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या वाघाळेकर यांच्या पेट्रोल पंपावर पेट्रोल भरुन घराकडे जात असलेले शिवसेनेचे नांदेड तालुकाप्रमुख उध्दव पाटील शिंदे आणि त्याचा मुलगा युवराज शिंदे हे आपल्या इनोव्हा गाडी ( एमएच २६ सि पी ५१५१) जात होते. त्याच्या पाठिमागुन येणाऱ्या आयचर गाडी ( आर जे ०९ जी ई ३०५७ )निष्काळजी पणाने गाडी चालवत इनोव्हा गाडीला जोराची धडक देवुन पळुन जात असताना नागरिकांनी त्याची गाडी पकडत त्या वाहनचालकास ग्रामिण पोलिसाच्या स्वाधिन केले. त्यानंतर ग्रामिण पोलिसांनी त्याचे वाहन पोलिस ठाण्यात आणुन लावले होते. पण ते वाहन दिसून आले नसल्याने व फिर्यादीची तक्रार घेण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचे निवेदनात नमूद केले आहे. सदरील गुन्हा दाखल करण्यासाठी तीन ते चार दिवस लावले असल्याने पोलिस निरीक्षक चिंचोलकर यांची बदली करावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा उद्धव शिंदे व मनोहर शिंदे यांनी जिल्हा पोलिस अधिक्षकांना दिला आहे.



ग्रामीण पोलिसांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हा पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह पोलीस अंमलदार सत्तार शेख, विक्रम वाकडे, शंकर माळगे, मारोती पचलिंगे, ज्ञानेश्वर कलंदर, विष्णू कल्याणकर, संतोष पवार, माधव माने, महिला पोलीस अंमलदार वैशाली घोनशेटवार यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान केला. यावेळी उप विभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांची उपस्थिती होती.

# पैसे देवुनही मनस्ताप..टावर आहे नावाला; रेंज नाही गावाला..

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०८ मार्च**

गेल्या अनेक वर्षापासून किनवट व परिसरात सर्वच मोबाईल कंपन्यांचे टॉवर उभारले गेले. मात्र गावात टावर असतानाही नेटवर्क मिळत नसल्याने मोबाईल धारक ग्राहकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी नेटवर्क मिळविण्यासाठी स्लॅपचा झाडाचा किंवा एखाद्या उंच जागेचा आधार घ्यावा लागतो. तरीही नेटवर्क मिळत नसल्याने ग्राहकांना पैसे देऊनही मनस्ताप सहन करावा लागत असल्याने टावर आहे नावाला अन रेंज नाही गावाला असे म्हणण्याची वेळ मोबाईल ग्राहकावर आली असुन पैसे देऊनही ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



परिसरात गेल्या अनेक वर्षापासून बीएसएनएल सह सर्वच खासगी मोबाईल कंपन्यांचे भले मोठे व उंच टावर उभे केले गेले. मात्र कंपन्यांच्या थातूरमातूर व दुर्लक्षित कारभारामुळे ग्रामीण भागात उभारलेल्या टावरला नेटवर्क मिळत नसल्याने अनेक ग्राहक नेटवर्क मिळवण्यासाठी आपला मोबाईल नंबर पोर्ट करीत आहेत. परंतु ज्या मोबाईल कंपनीकडे नंबर पोर्ट केला त्या मोबाईल कंपनीचे सुद्धा नेटवर्क मिळत नसल्याने अनेक नागरिक बऱ्याच वेळा उंच झाडावर चढून नेटवर्क मिळवण्यासाठी जीवघेणा

प्रयत्न करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामतः शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यासह व्यापारी कर्मचारी व सर्व सामान्य मोबाईल ग्राहक कमालीचे त्रस्त झाले आहेत. संबंधित मोबाईल कंपन्यांची मोबाईल नेटवर्क मधील तांत्रिक बिघाड लवकरात लवकर दुरुस्त करून चांगल्या प्रकारची सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी परिसरातील मोबाईल ग्राहक करत आहे. शासकीय निमशासकीय कार्यालयामधील कर्मचारी महा-ई-सेवा केंद्र तसेच ऑनलाईन काम करणारे सर्व केंद्र चालक त्रस्त झाले आहेत. मोबाईल

कंपन्यांचे अजिबातही नेटवर्क मिळत नसल्याने बाहेर गावावरून आलेल्या अनेक ग्राहकांना महा-ई-सेवा केंद्रामधून आल्या पावली काम न करता परत जावे लागते ही समस्या गेल्या अनेक वर्षापासून दररोजची व नेहमीचीच असल्याने ग्राहकासह केंद्र चालक सुद्धा त्रस्त झाले आहेत. अचानकच टॉवरला काही ना काही बिघाड येत असल्याने परिसरातील ग्राहक फारच कंटाळले आहे. सर्वच मोबाईल ग्राहक मोबाईल वरून आपली स्वतःची कामे सहज व सुलभ व्हावी म्हणून तात्काळ मोबाईल कंपनीचे महागडे रिचार्ज मारतात. मात्र रिचार्ज मारूनही बरेच वेळा फोन लागत नाही किंवा इतर ऑनलाईन कामे होत नसल्यामुळे सेवेत सुधारणा करून ग्राहकांना दर्जेदार सेवा द्यावी, अशी मागणी मोबाईल धारक करीत आहेत.

## दृष्टिक्षेप



# राष्ट्रोद्धारक स्वामी दयानंद सरस्वती

स्वामी दयानंद यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८२४ रोजी गुजरातमधील टंकारा येथे झाला. त्यांचे बालपणीचे नाव मूळशंकर होते. कुटुंब श्रीमंत आणि प्रभावशाली होते आणि त्यांच्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली, मूळशंकर यांनी नीतिशास्त्र, साहित्य आणि व्याकरणाचा अभ्यास केला. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी संपूर्ण यजुर्वेद संहिता पाठ केली होती.

मूळशंकर यांची बहीण आणि काका यांचे बालपणीच निधन झाले, त्यामुळे त्यांचे मन दु:खात बुडाले. यानंतर त्यांच्या मनात जीवन-मृत्यूचे गुंतागुंतीचे प्रश्न समजून घेण्याची जिज्ञासा निर्माण होऊ लागली. त्याच वेळी त्यांना सांसारिक गोष्टींविषयी विरक्ती वाटू लागली. त्यांची ही अवस्था पाहून वडिलांना काळजी वाटू लागली आणि त्यांनी मूळशंकरचा विवाह करण्याचा विचार केला, जेणेकरून ते पुन्हा सांसारिक गोष्टीत रस घेऊ लागतील. पण मूळशंकर या सगळ्या बंधनात अडकायला तयार नव्हते. त्यामुळे वडिलांनी ठरविलेल्या विवाहाच्या तारखेच्या काही दिवस आधी ते घर सोडून ज्ञानाच्या शोधात निघाले आणि ऋषी झाले.

प्रत्यक्ष ज्ञान प्राप्ती करण्यासाठी त्यांनी गुरूंचा शोध सुरू केला आणि स्वामी विरजानंदांच्या संपर्कात आले. स्वामी विरजानंदांची भेट झाल्यानंतर आपण ज्या गुरूंच्या शोधात होतो ते हेच याची त्यांना खात्री पटली. स्वामी विरजानंदांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले आणि त्यांना नवीन नाव देण्यात आले - दयानंद सरस्वती.

स्वामी विरजानंद यांच्या शिष्यत्वाखाली त्यांचे ज्ञान परिष्कृत झाले. वेदांचे ज्ञान हाच समाजाच्या उन्नतीचा आधार आहे असे स्वामी दयानंदांचे मत होते. वेदांच्या प्रचारासाठी त्यांनी देशव्यापी मोहीम सुरू केली. अखेर सामाजिक उन्नती आणि राष्ट्रीय प्रगतीच्या उद्देशाने स्वामी दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये मुंबईत आर्य समाजाची स्थापना केली. आर्य समाजाच्या माध्यमातून त्यांनी समाजात प्रचलित असलेल्या अंधश्रद्धा आणि रूढींना विरोध केला. भारताच्या प्राचीन ज्ञान परंपरेवरही त्यांनी भर देत वेदांकडे वळण्याचा संदेश दिला. 'गो बॅक टू वेदाज' असे ते ठिकठिकाणच्या व्याख्यानात सांगायचे. स्वामीजींनी वेदांना हिंदू धर्माचा मूळ स्त्रोत मानले आणि वैदिक मान्यतेनुसार हिंदू धर्माची उदारमतवादी व्याख्या प्रस्तुत केली.

३० ऑक्टोबर १८८३ रोजी दिवाळीच्या मुहूर्तावर जोधपूरचे महाराज जसवंतसिंह द्वितीय यांनी महर्षी दयानंद सरस्वती यांना आपल्या राजवाड्यात बोलावले आणि गुरूंचे आशीर्वाद मागितले. तेव्हा दयानंद सरस्वती यांनी महाराजांना दरबारी नृत्यांगनेचा त्याग करून धर्मजीवनाच्या मार्गाने अग्रेसर होण्याचा सल्ला दिला. तेव्हा नृत्यांगना स्वामी दयानंदांवर संतप्त झाली. तिने स्वयंपाक्याला हाताशी धरून स्वामीजींना देण्यात येणाऱ्या दुधात काचेचे तुकडे मिसळण्याचे कारस्थान रचले. त्यामुळे स्वामी दयानंद यांचा असह्य वेदनांनी मृत्यू झाला. मात्र, दिवाळीच्या दिवशी अजमेरमध्ये मृत्यूपूर्वी त्यांनी या कटात सहभागी असलेल्या स्वयंपाकीला माफ केले.

महर्षी दयानंद म्हणतात, 'जेव्हा माणूस धार्मिक असतो तेव्हा त्याचे शत्रूसुद्धा त्याच्यावर विश्वास ठेवतात आणि त्याचा स्वीकार करतात आणि जेव्हा तो अधर्मी असतो तेव्हा त्याचे मित्रही त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत. त्यामुळे कमी ज्ञान असलेला माणूसही चांगले शिक्षण घेऊन सुशील व विनम्र होतो आणि त्याचे कोणतेही काम बिघडत नाही.

आज आर्य समाज केवळ भारतातच नाही तर जगाच्या इतर भागातही सक्रिय आहे. अमेरिकेची संयुक्त संस्थाने (यूएसए), कॅनडा, त्रिनिदाद, मेक्सिको, युनायटेड किंगडम, नेदरलँड्स, केनिया, टांझानिया, युगांडा, दक्षिण आफ्रिका, मलावी, मॉरिशस, पाकिस्तान, बर्मा, थायलंड, सिंगापूर, हाँगकाँग आणि ऑस्ट्रेलिया हे काही देश आहेत जिथे आर्य समाजाच्या शाखा आहेत.

### स्वामी दयानंद सरस्वतींबद्दल मान्यवरांची विधाने

- डॉ. ॲनी बेझंट यांनी आपल्या 'इंडिया अ नेशन' या पुस्तकात लिहिले आहे, 'भारत हा भारतीयांसाठीच आहे', हे स्वामी दयानंदजी यांनी सर्वप्रथम घोषित केले.
- डॉ. ॲनी बेझंट यांनी कलकत्ता काँग्रेसच्या अधिवेशनात सांगितले होते- जेव्हा स्वराजाचे मंदिर उभारण्यात येईल, तेव्हा त्यात मोठ मोठ्या नेत्यांच्या मूर्ती असतील आणि सर्वांत उंच पुतळा दयानंद यांचा असेल.
- 'स्वामी दयानंद सरस्वती हे स्वातंत्र्यलढ्यातील सर्वांत पहिले योद्धे आणि हिंदू जातीचे रक्षक होते, असे उद्‌गार महान क्रांतिकारक व समाजसुधारक वीर सावरकर यांनी काढले होते.
- **इंदिरा गांधी -** आपल्या देशाने अनेक महापुरुषांना आणि सुधारकांना जन्म दिला आहे, त्यापैकी महर्षी दयानंद आहेत. समाजात पसरलेली अंधश्रद्धा आणि विशेषत: उच्च-नीच भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. ज्याप्रमाणे महर्षी दयानंदांनी प्राचीन ग्रंथांचा पुन्हा अभ्यास केला पाहिजे, असा उपदेश केला, त्याचप्रमाणे आपण त्यांच्या शिकवणीला योग्य संदर्भात मांडणे आवश्यक आहे.
- **जगजीवनराम -** 'आर्य समाजाचे सामाजिक सुधारणेत महत्त्वाचे योगदान आहे. महर्षी दयानंद यांची तत्त्वे, आदर्श आणि शिकवण आर्य समाजाद्वारे प्रसारित केली जाते, ज्यामुळे समानतेवर आधारित जात-विरहित समाजवादी समाज निर्माण करण्याची भावना लोकांमध्ये रुजवण्यास मदत होते.
- **पंतप्रधान नरेंद्र मोदी -** 'आपल्या परंपरा आणि अध्यात्म लोप पावत असताना स्वामी दयानंद यांनी पुन्हा वेदांकडे वळण्याचे आवाहन केले. महर्षी दयानंद हे केवळ वैदिक ऋषीच नव्हते तर ते राष्ट्र ऋषी देखील होते.

स्वामी दयानंद सरस्वती यांचे प्रमुख ग्रंथ व वाङ्मय

१) सत्यार्थप्रकाश २) संस्कृत वाक्य प्रबोध ३) ऋग्वेदादि भाष्य भूमिका ४) व्यवहारभानु ५) आर्योद्देश्यरत्नमाला ६) गोकरुणानिधि ७) यजुर्वेदभाष्य

> **महर्षी दयानंद म्हणतात, 'जेव्हा माणूस धार्मिक असतो तेव्हा त्याचे शत्रूसुद्धा त्याच्यावर विश्वास ठेवतात आणि त्याचा स्वीकार करतात आणि जेव्हा तो अधर्मी असतो तेव्हा त्याचे मित्रही त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत. त्यामुळे कमी ज्ञान असलेला माणूसही चांगले शिक्षण घेऊन सुशील व विनम्र होतो आणि त्याचे कोणतेही काम बिघडत नाही.**

### महर्षि दयानंद, आर्य समाजाचे संस्थापक

आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांची गणना जगातील महान शिक्षक आणि प्रबोधनकारांमध्ये केली जाते. त्यांनी जगातील लोकांना अंधारातून प्रकाशाकडे, असत्याकडून सत्याकडे आणि मृत्यूपासून अमरत्वाकडे जाण्यास सहकार्य केले. आर्य समाज हा काही नवीन पंथ, संप्रदाय किंवा धर्म नाही. त्याचे प्रवर्तक स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, आर्य समाजाची स्थापना करून त्यांनी कोणताही नवीन संप्रदाय सुरू केला नसून, प्राचीन वैदिक धर्म, वैदिक संस्कृती, सभ्यता आणि परंपरा यांची पुनर्स्थापना केली आहे. त्यांचा उद्देश एवढाच होता की काळाच्या ओघात खऱ्या सनातन धर्मात आणि त्याच्या अनुयायांमध्ये ज्या अवैदिक गोष्टी, अंध परंपरा, रूढी आणि सामाजिक अनिष्ट प्रथा यांचा शिरकाव झाला आहे त्या दूर करून शुद्ध वैदिक धर्म सर्वसामान्य लोकांसमोर यावा.

हे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी महर्षी दयानंद यांनी १८७५ मध्ये मुंबईत आर्य समाजाची स्थापन केली. त्यानंतर स्वामीजींनी स्वत: लाहोर, फरुखाबाद, मेरठ, रुडकी, लखनौ, दिल्ली, अजमेर इत्यादी ठिकाणी आर्य समाजाची स्थापना केली. ते जिथे जात, व्याख्याने देत, संवाद-चर्चा करीत तेथे आर्य समाजाच्या शाखेची स्थापना होत असे. त्यांच्या मृत्यूनंतर देखील देशविदेशात अनेक ठिकाणी शाखा स्थापन झाल्या.

महर्षी दयानंदांचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यांना प्रत्येक व्यक्तीची आणि समाजाची सर्वांगीण प्रगती हवी होती. व्यक्ती आणि समष्टीचे शरीर, मन आणि आत्मा निरोगी असावे आणि सर्वांनी परमेश्वराच्या छत्रछायेखाली एकाच कुटुंबातील सदस्य म्हणून प्रेमाने एकत्र राहावे आणि एकमेकांच्या प्रगती, योग क्षेत्र आणि संरक्षणास हातभार लावावा, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी स्वत: यावर भर दिला आणि नंतर आर्य समाजाने आपल्या सर्व धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि नैतिक कार्यक्रम आणि सुधारणांमध्ये हे लक्षात घेऊन त्याला ठोस स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे आर्य समाजाला जागतिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. स्वामीजी प्रामुख्याने देशवासीयांना आर्य समाजात सामील होण्यासाठी आणि त्यांच्यासोबत स्वतःच्या आणि देशाच्या सर्व प्रकारच्या प्रगती आणि विकासासाठी कार्य करण्याची प्रेरणा देत असत. आर्य समाजाचे भविष्य अतिशय उज्ज्वल असल्याचे त्यांचे मत होते आणि या संस्थेकडून त्यांना खूप आशा होती.

आर्य समाजाचा पाया असलेले वेद, वैदिक शिकवण, शाश्वत वैज्ञानिक, तात्विक, सार्वभौम, उदात्त वैदिक तत्त्वांशी एकरूप सत्यार्थ प्रकाश आणि स्वामीजींचे उपदेश आहेत. 'वेदांकडे परत वळा' ही त्यांची घोषणा संपूर्ण भारतात प्रचंड गाजली.

भारताची भाषा, धर्म, संस्कृती, साहित्य, इतिहास, देशभक्ती इत्यादी नष्ट करण्याच्या उद्देशाने केलेली लॉर्ड मॅकॉलेची शिक्षण योजना हाणून पाडून, देशातील विद्यार्थ्यांमध्ये त्यांची मातृभाषा, धर्म, संस्कृती इत्यादींबद्दल अपार श्रद्धा आणि स्वाभिमान जागृत करण्यासाठी स्वामीजींच्या योजनेनुसार आर्य समाजाने उत्तर भारतातील जवळजवळ सर्वच प्रांतात गुरुकुल, शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना केली. राष्ट्रपिता महात्मा गांधी जेव्हा दक्षिण आफ्रिका सरकारच्या वर्णद्वेषी धोरणाविरुद्ध सत्याग्रह करत होते, तेव्हा गुरुकुल कांगडीच्या विद्यार्थ्यांनी आपला तुप-दुधाचा नित्यक्रम सोडून आणि दुधिया धरणावर मजुरी करून निधी गोळा केला आणि गांधीजींना मदत करण्यासाठी पाठवला. त्यामुळे भारतात आल्यानंतर महात्मा गांधी गुरुकुल कांगडीच्या त्या मुलांना आशीर्वाद देण्यासाठी तेथे गेले होते.

### आर्य समाजावर अन्यायकारक निर्बंध आणि कट्टरवाद्यांचे हल्ले

ब्रिटिश सरकारने अनेक ठिकाणी विशेषतः मशिदींसमोर आर्य समाजाच्या नगर-कीर्तनांवर बंदी घातली होती. १९२६ मध्ये मुरादाबाद आणि १९३० मध्ये पानिपत येथे असे अन्यायकारक निर्बंध लादण्यात आले. २२ नोव्हेंबर १९३० रोजी एका ब्रिटिश अधिकाऱ्याने बुट घातलेल्या काही सैनिकांसह बहादुराबाद, सहारनपूर येथील आर्य समाज मंदिरात जबरदस्तीने प्रवेश करून वेदीचा अपमान केला आणि ओम चिन्हांकित ध्वज फाडून टाकला. ब्रिटिश काळात राजकीय आणि धार्मिक चळवळींसाठी तुरुंगवासाची शिक्षा झालेल्या आर्य सत्याग्रहींना तुरुंगात हवन करण्यास बंदी घालण्यात आली होती.

२३ डिसेंबर १९२६ रोजी दिल्लीत पहाटे ४ वाजता अब्दुल रशीद नावाच्या धर्मांधाने स्वामी श्रद्धानंद यांची हत्या केली. १९२७-१९४२ दरम्यानच्या मुस्लिम कटांमुळे, लाहोरमध्ये माननीय राजपाल यांची हत्या आणि त्यानंतर लाहोरमध्ये इतर दोन आर्य बंधूंची हत्या, १९३४ मध्ये बहराईचच्या साहू बद्रीशाहची हत्या, कराची येथील आर्य समाजानेते पंडित नाथुराम यांची हत्या मुस्लिम कट्टरवाद्यांनी केली. त्यामुळे स्वसंरक्षणासाठी आर्य वीर दल आणि आर्य रक्षा समितीची स्थापना करण्यात आली. हिसार जिल्ह्यातील लौहरू संस्थानाचा शासक मुस्लिम होता तर बहुतांश प्रजा हिंदू होती. १९३६ आणि १९४० मध्ये दोनदा मुस्लिम कट्टरवाद्यांनी आर्य समाजाच्या नगर-कीर्तनांवर हल्ले केले. सिंधच्या मुस्लिम लीग सरकारने २६ ऑक्टोबर १९४४ रोजी सत्यार्थ प्रकाशाच्या प्रकाशनावर बंदी घातली.

### महर्षी दयानंद यांच्या सामाजिक सुधारणा

स्वामी दयानंदांच्या काळात समाज हा विविध अवडंबर, दिखाऊपणा आणि विकृतीने वेढलेला होता. एकीकडे साम्राज्यवादी ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढा सुरू होता तर दुसरीकडे समाजात व्यापक व सर्वसमावेशक सुधारणा करण्याची गरज होती. स्वामीजींनी सामाजिक रूढी आणि वाईट प्रथांना विरोध करून समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेले. यासाठी त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली, हे लक्षात घेतले पाहिजे.

वैदिक आणि बौद्ध काळापर्यंत भारतीय स्त्रियांमध्ये पडदा, डोक्यावर पदर, चेहरा झाकणे व तत्सम प्रथांचा उल्लेख नाही. मोगल काळात पडदा प्रथा प्रचलित झाली, परिणामी महिला हळूहळू घराच्या चार भिंतीत बंदिस्त झाल्या. स्वामीजींनी या समस्येकडे लक्ष दिले. यासाठी त्यांनी सार्वजनिक कार्यक्रम आणि समारंभांमध्ये महिलांच्या सहभागावर भर दिला. स्वामीजींच्या प्रयत्नांमुळे महिलांना हळूहळू पडदा प्रथेपासून मुक्ती मिळू लागली. पडदा प्रथेप्रमाणे स्वामी दयानंद सरस्वती यांनी सती प्रथेविरुद्ध देखील आवाज उठवला होता. त्यांनी विधवा महिलांच्या जीवनात प्रकाशाची ज्योत पेटवली. यासाठी त्यांनी पुनर्विवाह घडवून आणले, ज्यामुळे विधवा स्त्रियांना नवजीवन प्राप्त झाले.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी बालविवाहाच्या विरोधात देखील मोहीम सुरू केली, जेणेकरून समाजाला या कुप्रथेपासून मुक्ती मिळावी. मध्यवर्ती विधानसभेत राजस्थानचे प्रसिद्ध आर्य समाज नेते दिवाण बहादूर हरविलास शारदा यांनी यासाठी कायदाही केला होता. बालपणात विवाह केल्याने पुरुषापेक्षा स्त्रीचे जास्त नुकसान होते. ज्याप्रमाणे कच्च्या शेतात कापणी केल्याने अन्नाचा नाश होतो, त्याचप्रमाणे लहान वयात जे आपल्या मुलांचे लग्न लावून देतात त्यांचा वंश बिघडतो, असे स्वामी दयानंदांचे मत होते. स्वामी दयानंद सरस्वती यांनीही बहुपत्नीत्वाला विरोध केला आणि एकपत्नीत्वाचा आदर्श सिद्धांत मांडला.

महर्षि दयानंद म्हणतात - 'ज्या साधनाने मनुष्याला ज्ञानासारखे चांगले गुण प्राप्त होतात आणि अज्ञान इत्यादी दुर्गुणांचा त्याग करून सदैव आनंदी राहता येते, त्याला शिक्षण असे म्हणतात.

### गोरक्षण सत्याग्रह

स्वामी दयानंद सरस्वती यांनी धार्मिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून गोरक्षणावर मोठा भर दिला आहे. त्यांच्या हयातीत त्यांनी तत्कालीन व्हाईसरॉय आणि कमांडर-इन-चीफ यांची भेट घेऊन गोहत्या बंद करण्याची विशेष मागणी केली होती. महर्षींनी 'गोकरुणानिधी' हे पुस्तक लिहून आपल्या या कार्यक्रमाची संकल्पना स्पष्ट केली. आर्य समाजाच्या विशाल कार्यक्रमात गोरक्षणाला विशेष स्थान आहे.

महर्षि दयानंद लिहितात - प्राण्यांना भरपूर गवत, पाने, फळे, फुले इत्यादि खाऊ द्या आणि त्यांना अमृतरूपी दूध इत्यादी रत्ने पाहू द्या. विविध प्रकारे अन्न उत्पादन करा, प्रत्येकाची बुद्धिमत्ता सामर्थ्य आणि शौर्य वाढवा, निश्चयी व्हा. महर्षि दयानंद यांनीही 'गोरक्षकसभासद' चे नियम बनवले आहेत जे त्यांनी आपल्या 'गोकरुणानिधि' या पुस्तकात स्पष्ट केले आहेत.

**(विचार विनिमय न्यास, दिल्ली वरून साभार)**

### संदर्भ ग्रंथ

१) स्मारिका, अंतराष्ट्रीय आर्य समाज स्थापना शताब्दी समारोह, नई दिल्ली
२) विष्णु प्रभाकर, भारतीय साहित्य के निर्माता : स्वामी दयानंद सरस्वती
३) महर्षि दयानंद, आर्योद्देश्यरत्नमाला
४) महर्षि दयानंद, अथ व्यवहारभानु:
५) महर्षि दयानंद, गोकरुणानिधि:

## आहार

# विविध आजारांवर गुणकारी डाळींब

फळांमध्ये अनेक पौष्टिक तत्व असतात. व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स यांच्याशिवाय फळांमध्ये इतरही पौष्टिक तत्त्वे मुबलक प्रमाणात असतात. मानवी आरोग्यासाठी सर्वच फळे ही फायदेशीर मानली जातात. त्या फळांमध्ये डाळिंबाचाही समावेश आहे. हे फळ चवीला गोड असते. डाळिंबामध्ये व्हिटॅमिन सी आणि बी आढळून येते. तर मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉस्फरस, सेलेनियम आणि झिंक हे मुबलक प्रमाणात असते. अनेकदा अशक्तपणा दूर करण्यासाठी आणि शरीरातील रक्त वाढवण्यासाठी डॉक्टर डाळींब खाण्याचा सल्ला देतात. डाळींब हे गोड आणि अतिशय चविष्ट फळ असून अनेक आजारांवरही ते गुणकारी आहे. अशक्तपणा दूर करण्यासाठी डॉक्टर डाळींब खाण्याचा सल्ला देतात. ते व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन बी चा उत्तम स्त्रोत आहे. डाळिंबामध्ये मॅग्नेशिअम, पोटॅशिअम, फॉस्फरस, सेलेनियम आणि झिंक (जस्त) मोठ्या प्रमाणात असते. डाळिंबाच्या सेवनाने शरीराला अनेक फायदे होतात. मात्र ते खाल्ल्याने काही तोटेही होऊ शकतात.डाळिंब खाण्याचे फायदे :

**पेशींना बळकटी मिळते -** डाळिंबामध्ये अनेक शक्तिशाली अँटी-ऑक्सिडेंट गुणधर्म असतात. डाळिंबाच्या रसात इतर फळांच्या रसापेक्षा अधिक अँटी-ऑक्सिडेंट असतात. त्याचे सेवन केल्याने पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण होऊ शकते. तसेच सूज कमी होते.

शरीरात रक्त कमी असल्यास डाळींब खाण्याचा सल्ला दिला जातो. यामध्ये अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. डाळिंबाच्या फळामध्ये इतर फळांपेक्षा जास्त प्रमाणात अँटिऑक्सिडंट गुणधर्म आढळतात. यामुळे नुकसान होणाऱ्या पेशींचे संरक्षण होते. जर कॅन्सरपासून बचाव करायचा असेल तर तुम्ही रोजच्या आहारात डाळिंबाचे सेवन करू शकता, असे अनेक तज्ज्ञांचे म्हणणे आहे. डाळींब सेवनामुळे प्रोस्टेट कर्करोगाच्या पेशी टाळण्यासाठी मदत होते. कॅन्सरने त्रस्त असलेल्या लोकांनी रोज एक ग्लास डाळिंबाचा रस पिणे गरजेचे आहे. यामुळे कर्करोगाचा धोका कमी होऊ शकतो. अल्झायमरपासून बचाव करायचा असल्यास रोज एक डाळिंब खाणे आवश्यक आहे. डाळिंबामध्ये असलेल्या बिया अल्झायमर रोगाचा विकास रोखतात आणि व्यक्तीची स्मरणशक्ती मजबूत करतात. डाळिंबाचा रस प्यायल्याने पचनाचा त्रास कमी होतो. पचनक्रिया सुधारू लागते. सांधेदुखी, वेदना आणि इतर प्रकारच्या संधिवातवर डाळिंब हे फायदेशीर ठरते. यामुळे संधिवाताचा त्रास कमी होतो. हृदयविकारावर डाळिंबाचा रस फायदेशीर आहे. रक्तदाबाच्या रुग्णांना डाळिंबाचा रस पिण्याचा सल्ला डॉक्टर देतात. इंसुलिन आणि रक्तातील साखर कमी करण्यासाठी डाळींब फायदेशीर आहे.

> **शरीरात रक्त कमी असल्यास डाळिंब खाण्याचा सल्ला दिला जातो. यामध्ये अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. डाळिंबाच्या फळामध्ये इतर फळांपेक्षा जास्त प्रमाणात अँटिऑक्सिडंट गुणधर्म आढळतात. यामुळे नुकसान होणाऱ्या पेशींचे संरक्षण होते.**

**पचन -** डाळिंबाचा रस प्यायल्याने आतड्याची सूज कमी होते तसेच पचन सुधारते. मात्र डायरियाच्या रुग्णांना डाळिंबाचा रस न पिण्याचा सल्ला दिला जातो.

**सांधेदुखी -** डाळिंबाचा रस सांधेदुखी, वेदना आणि सूज कमी करण्यात फायदेशीर ठरतो.

**हृदयविकार -** हृदयविकाराची समस्या असल्यास, डाळिंबाचा रस पिणे लाभदायक ठरते. हृदय आणि धमन्या यांचे वेगवेगळ्या आजारांपासून संरक्षण करण्यासाठी डाळिंबाचा रस प्यायचा सल्ला दिला जातो.

**रक्तदाब -** रक्तदाबाच्या रुग्णांसाठी डाळिंबाचा रस फायदेशीर मानला जातो.

**मधुमेह -** मधुमेह उपचारात डाळिंबाच्या रसाचे सेवन केले पाहिजे. डाळिंबाचा उपयोग इन्सुलिन कमी करण्यासाठी आणि रक्तातील साखर कमी करण्यासाठी केला जातो.

**डाळिंब खाण्याचे तोटे :** डाळिंबाचे साल, मूळ किंवा खोडाचा जास्त प्रमाणात वापर करणे असुरक्षित ठरते, कारण त्यामध्ये विष असू शकते. कमी रक्तदाबाच्या रुग्णांनी डाळिंबाच्या रसाचे सेवन कमी प्रमाणात करावे. अतिसाराचा त्रास होत असेल तर डाळिंबाचा रस सेवन करू नये. डाळिंबाचा रस त्वचेवर लावल्यास काही लोकांना खाज येणे, सूज येणे अथवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

**(पांचजन्यवरून साभार)**



## चौफेर

# आग्नेय आशियातील भारतीय संस्कृती

भारतीय राजांनी अतिपूर्वेकडील देशात विशेषत: आग्नेय आशियात वसाहती व राज्ये स्थापन करून भारतीय संस्कृतीचा प्रसार व प्रचार केला. बाली, फूनान या आग्नेय आशियात भारतीय जीवनपद्धतीचा प्रभाव होता, असे विविध ऐतिहासिक ग्रंथातून स्पष्ट होते.

भारतीय संस्कृतीतील धर्मशास्त्र, सूत्रवाङ्मय, वेद, उपनिषदे, उपवेद, वेदांगे, आश्रमपद्धती यांचा प्रसार देखील आग्नेय आशियात झाला आणि त्याचे पडसाद सामाजिक परिस्थितीवर उमटले. हिंदू समाजाची उभारणी ज्या मूलभूत व्यवस्थांवर अवलंबून होती, त्या व्यवस्था येथेही रूढ झाल्या. शिवाची पूजा करणारे व बुद्धांची पूजा करणारे लोक तेथे होते, असे दिसून येते. बालीतील राजे वैश्य होते. तेथे विशिष्ट जातींकडे विशिष्ट व्यवसाय नव्हते. सर्व स्तरातील लोक शेती करत व शेतीशिवाय इतर कारागिरी व व्यवसाय देखील करीत.

धार्मिक स्थिती : मलाया द्वीपकल्पात पूर्वजपूजा, मूर्तिपूजा रूढ होती. बालीमध्ये घरोघर सूर्यपूजा केली जाई. सूर्य म्हणजे शिवाचेच एक रूप मानीत. हिंदू गृह्यसूत्रातले बहुतेक सर्व विधी प्रचारात होते. देवपूजा करताना संस्कृत मंत्रच म्हणत. आजही बालीमध्ये प्रार्थना संस्कृतातूनच म्हटली जाते. सूर्यपूजा करताना सप्तनद्यांचे स्मरण करीत. घंटा वाजवून मंत्रघोष करीत. त्रिमूर्तींचे स्मरण करून प्रार्थना म्हणत. गंध, अक्षता, पुष्प, धूप, दीप यांना नमन करीत. यज्ञोपवीत धारण करीत. जपाकरता १०८ मण्यांची अक्षमाला प्राचीन काळापासून वापरीत.

राजकीय हक्क आणि समाजातील स्थान या दृष्टीने जावातील स्त्रियांची स्थिती समाधानकारक होती. कित्येक स्त्रियांनी राज्य केले. अधिकृत अहवालामध्ये गुणप्रियाचे धर्मपत्नी या नात्याने नाव पतीच्या खालोखाल असे. जयनागरनंतर 'राजपत्नी' गादीवर आली आणि तिच्या मुलीचा मुलगा असूनही तिच्या मुलीनेच तिला राज्यकारभारात मदतनीस म्हणून साहाय्य केले. राजाकडून नजराणे मिळण्याच्या प्रसंगी पतीबरोबर पत्नीलाही नजराणा मिळे आणि शिलालेखांतही त्यांच्या नावांची नोंद केली जाई. पडदा वा गोषापद्धती अस्तित्वात नव्हती व स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत. स्वयंवराचे काही उल्लेख सापडतात. स्त्रियांना पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. लग्नाच्या विधीसाठी नवऱ्या मुलाला नववधूच्या घरी जाऊन तीन दिवस रहावे लागे व सर्व सोहळा उरकल्यानंतर तिला घेऊन तो स्वगृही परत येत असे. नृत्य, गाणी, नाटके आणि इतर करमणूक केल्याशिवाय विवाहसमारंभ पार पडत नसत. चंपा व कंबुन देशांमध्ये विवाहपद्धती संपूर्णतः भारतीय पद्धतीशी मिळती जुळती होती.



नक्षीकाम व कलाकुसर केलेली तऱ्हेतऱ्हेची कर्णकुंडले, बांगड्या, गळ्यातील हार, पैंजण, कंबरपट्टा, अंगठी इत्यादी विविध प्रकारचे दागिने असत. चंपामधील लोक केशभूषेला फार महत्त्व देत. त्यातील अनेकविध तऱ्हा शिल्पकलेच्या रूपाने अस्तित्वात आहेत. चंपामध्ये विशिष्ट जातीचे लोक विशिष्ट पोषाख करीत. विशिष्ट पोषाख करणे व विशिष्ट वाहनांचा वापर करणे वा राजाजवळची जागा मिळविणे, या गोष्टी प्रतिष्ठेच्या द्योतक समजल्या जात.

कंबुज देशातील ताम्रपटांवरून येथील शिक्षणाची केंद्रे भारतीय आश्रमांप्रमाणे होती असे आढळते. या आश्रमांमध्ये धर्मगुरूंच्या व विद्वान पंडितांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शिष्यगण अभ्यास करीत. कंबुज देशातील कितीतरी राजे आपला वेळ ज्ञानसंपादनात घालवीत. एकट्या यशोवर्मन राजाने शंभराहून अधिक आश्रम बांधले. या आश्रमांची व्यवस्था, कार्य आणि स्वरूप यांबाबत राजांनी आचारसंहिता तयार केलेली होती. या आश्रमातील धर्मगुरू व पुरोहित यांना समाजात मानाचे स्थान असे.

ऐरलंगाच्या वेळी शैव महायान व ऋषिधर्म हे सर्वत्र प्रचलित होते. वरच्या थरांतील लोक तांत्रिक महायान पंथाचे पालन करीत. तंत्रपूजेची परिणती बहुतेक चक्रपूजेत होत असे. शैव आणि बौद्ध धर्मगुरूंचे येथील समाजजीवनावर फार प्राबल्य होते. त्यांची सत्ता मर्यादित ठेवणे राजांनाही कठीण जाई. ऐरलंगाने मात्र सुरूवातीपासून धर्मगुरूंवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते.

जावामध्ये फार प्राचीन काळापासून पूर्वजपूजा प्रचलित होती. हे पूर्वज कोणत्यातरी चंडीत (देवालयात) निवास करीत, अशी समजूत होती. राजा ऐरलंग चंडीत जाऊन पूजाअर्चा करीत असे, ही परंपरा त्याच्या वंशजानीही चालू ठेवली. भारतीय संस्कृतीचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी जुन्यानव्याची सांगड घातली. फूनान व कंबुज यांत हिंदू व बौद्ध हे दोन्ही धर्म प्रचारात होते. हिंदूंमध्ये विशेषतः शैव व वैष्णव लोकप्रिय होते.

फूनानचा राजा जयवर्मन याच्या व्यापाऱ्यांबरोबर कॅंटनहून एक बौद्ध भिक्षू आला. त्याचे नाव नागसेन होते. त्याने चीनच्या राजाला आपल्या देशाचा महेश्वर हा प्रमुख पंथ आहे असे सांगितले. फूनानमध्ये वैष्णव पंथीयांचे शिलालेख आहेत. विष्णूच्या पादुकांची पूजा केल्याचे उल्लेखही सापडतात. कंबुजमध्ये शिवाच्या पादुकांनाही विष्णूच्या पादुकांइतकेच महत्त्व होते. शिवमूर्ती आणि लिंगाचे उल्लेख सर्वत्र आढळतात. पाशुपत भागवत धर्म, त्रैलोक्यसार यांचे उल्लेख सातव्या शतकातील शिलालेखांत सापडतात. देवालये बांधताना वर्षासने द्यावयाची पद्धत होती. या वर्षासनांमुळे मंदिरांची जोपासना होई. हिंदूंच्या त्रिमूर्तींपैकी चंपामध्ये शिवमूर्तीला फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. चंपाच्या प्राचीन शिलालेखांत धर्माचा उल्लेख नाही. यानंतरचे सहा शिलालेख शैवपंथीयांचे आहेत. इ.स. चौथ्या शतकांत राजा भद्रवर्मन याने एक शिवमंदिर बांधले व त्याचे नाव 'भद्रेश्वरस्वामी' असे ठेवले. हे देवालय पुढे सबंध चंपाचे राष्ट्रीय देवालय बनले. इ.स. सहाव्या किंवा सातव्या शतकांत शंभुवर्मनने या देवालयात शिवमूर्तीची पुन्हा स्थापना केली. भद्रवर्मनच्या शिलालेखात प्रथम उमा-महेश्वराची प्रार्थना केली असून पुढे पृथ्वी, आप, तेज, वायू व अग्नी यांना नमस्कार केला आहे. वैष्णव धर्माचा उल्लेख प्रकाशधर्म राजाच्या काळात सापडतो कारण त्याने एक विष्णूचे व दुसरे वाल्मीकिचे अशी दोन देवालये बांधली. जगद्गुरू म्हणून विष्णूचा आणि संपूर्ण विश्वाचा एकमेव ईश्वर म्हणून शिवाचा उल्लेख त्यांच्या लेखांत सापडतो. एकंदरीत चंपामध्ये शैव धर्माचे प्राबल्य बरेच होते, हे तेथील शिवमंदिरांवरून स्पष्ट होते.

**(संकलित)**

# महिला बचत सक्षम करण्यासाठी बँकांनी सहकार्य करावे- आ. मुटकुळे

## महिला बचत गटांच्या वस्तूंचे जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मार्च**

महिला बचत गट सक्षम करण्यासाठी बँकांनी बचत गटांना शुन्य टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करून दिले पाहीजे. बचत गटांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून दिली पाहीजे. बचत गटांनी सध्याच्या मागणीनुसार वस्तूंची निर्मिती केल्यास महिला बचत गट निश्चितच सक्षम होतील, असे मत भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महिला व बालविकास विभागाअंतर्गत आर्थिक विकास महामंडळाच्यावतीने तेजस्वीनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्दम विकास प्रकल्पांतर्गत बचत गटाद्वारे उत्पादीत वस्तूंचे जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलतांना तान्हाजी मुटकुळे म्हणाले की, महिला बचत गट खरोखर सक्षम करण्यासाठी बँकांनी त्यांना अल्प व्याजाने कर्ज दिले पाहीजे. ग्रामीण भागातील महिला बचत गटांना आर्थिक ताकद मिळाली पाहीजे यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शनासोबतच बाजारपेठही उपलब्ध करून देण्याची गरज आहे. महिला बचत गटांनीही सध्याच्या परिस्थितीनुसार कोणत्या वस्तूंची जास्त मागणी आहे. याचा विचार करून वस्तूंची निर्मिती केली पाहीजे तरच बचत गटांना त्याचा फायदा होणार आहे. त्यातून महिलांना आर्थिक ताकद मिळणार आहे. यासाठी संबंधीत यंत्रणांनी महिला बचत गटांना पाठबळ देण्याची आवश्यकता आहे. महिला सक्षम झाली की संपूर्ण कुटुंब उभे राहते.

महिला बचत गटाचा दि २३ मार्चला पुन्हा मोठा मेळावा घेणार असून त्यासाठी आंध्र प्रदेशमधील काही मार्गदर्शकांना बोलावण्यात येणर आहे. शासनाकडे महिला बचत गटांना शुन्य टक्के व्याजाने देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन यावेळी आ. मुटकुळे यांनी दिले. याप्रसंगी आ. मुटकुळे यांनी प्रदर्शनीतील महिला बचत गटांच्या स्टॉलला भेट देत माहीती घेतली.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयाजीराव पाईकराव, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कृषी अधीक्षक राजेंद्र कदम, महिला बालविकास अधिकारी राजाभाऊ मगर, समन्वयक विलास जगताप यांची उपस्थिती होती. हे विक्री प्रदर्शन दि ८ ते १० मार्चपर्यंत सुरू राहणार असून या प्रदर्शनाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुनील चव्हाण यांनी तर प्रास्ताविक समन्वयक विलास जगताप यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गजानन खिरोडकर, संकेज महाजन, संतोष ठाकूर, शेख रफीक यांच्यासह सर्व सीएमआरसी व्यवस्थापक, उपजीवीका सल्लागार, लेखापाल, सर्व सहयोगिनी यांनी परिश्रम घेतले.

# पोलिस विभागाच्यावतीने महिला दिनानिमित्त महिलांची बाईक रॅली

## महिला कर्मचारी, पत्रकारांना नवीन कायद्याचे प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मार्च**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त पोलिस विभागाच्यावतीने दि ८ मार्च रोजी विविध विभागातील महिला कर्मचारी यांची मोटार सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवली तसेच महिला कर्मचारी व पत्रकारांना नवीन कायद्याचे प्रशिक्षणही यावेळी देण्यात आले.

येथील पोलिस अधीक्षक कार्यालयापासून सकाळी १० वाजता महिला मोटारसायकल रॅलीला सुरूवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली. यामध्ये विविध विभागाच्या महिला कर्मचारी सहभागी झाल्या होत्या. यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी महिलांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

तसेच पत्रकार आणि महिला कर्मचाऱ्यांना नवीन कायद्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी नवीन कायद्यात इंडीया ऐवजी भारत हा शब्द समाविष्ट करण्यात आला असून तसेच पूर्वीच्या कायद्यात जम्मू कश्मीर वगळून असा शब्द होता. आता जम्मू कश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग दाखविण्यात आला आहे. तसेच बालकांचे १८ वर्ष हे निश्चित करण्यात आले असून बालकांच गैरवापर कराण्याविरूध्द शिक्षेची तरतुद केली आहे. प्रत्यक्षात दंगा करणरे व त्यांना चिथावणी देणारे हे एकच समजण्यात आले आहे. संघटीत गुन्हेगारीबाबत कायद्यात स्पष्ट उल्लेख केला असून छोट्या गुन्ह्यांचा सुध्दा संधटीत गुन्हेगारीत समावेश करण्यात आला आहे. तसेच राजद्रोहाची व्याख्या निश्चित केली असून सोशल मिडीयावर गुन्ह्यांचा सुध्दा नवीन कायद्यात समावेश केला आहे. गुन्ह्यानुसार शिक्षा वाढविण्यात आली आहे. महिलांची चैन हिसकावण्यासंदर्भात स्वतंत्र कलम समाविष्ट केले आहे. डॉक्टरांच्या निष्काळजीपणाची स्पष्टता कायद्यात केली आहे. विवाहाचे, पैशाचे आमिष देवून महिलांचे लैंगिक शोषण करण्यासंदर्भात व्याख्या व शिक्षा स्पष्ट केली आहे. मॉब लिंचींग बाबत कठोर शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांची उपस्थिती होती.

# लाकडांची तस्करी करणारा ट्रक वन विभागाने केला जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मार्च**

हिंगोली वनविभागाचे पथक गस्तीवर असतांना विनापरवानगी अवैधरित्या तोड केलेल्या बेहडा आणि आंबा प्रजातीच्या लाकडांची तस्करी करणारा ट्रक क्रमांक एमएच ४० बीएल ९९१४ वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी जप्त केला असून लाकडासह ट्रक असा एकूण ७ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त करीत संबंधीतांवर कारवाई करण्यात आली आहे.

वन विभागाचे पथक गस्तीवर असतांना संशयावरून एका ट्रकची पथकाने तपासणी केली असता त्यांना या ट्रकमध्ये बेहडा आणि आंबा या प्रजातीच्या लाकडाची विनापरवाना आणि अवैधरित्या तोड केलेले ७३ नग भरलेले आढळून आले. त्यांचा आकार ९ घनमीटर असून पथकाने लाकडासह ट्रक जप्त केला आहे. याप्रकरणी चालक शेख आरीफ शेख बाबू यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. तसेच सदरील ट्रक शेख रिजवान शेख रहेमान यांच्या नावे नोंद आहे. सदर प्रकरणी वन गुन्हा नोंद करण्यात आला असून अवैध वाहतुकीतील वृक्षतोड कोणत्या ठिकाणाहून केली व त्याची वाहतुक कोणत्या ठिकाणी होत होती. याबाबत पुढील तपास वनविभाग करीत आहे. सदरील कार्यवाही वन परिमंडळ अधिकारी शिवरामकृष्ण चव्हाण, सारंग शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, सचिन माने, विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



**हिंगोली- जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालविकास विभागाच्यावतीने तेजस्वीनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत बचत गटाद्वारे उत्पादीत वस्तुंचे जिल्हास्तरीय प्रदर्शनात स्टॉलला आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी भेट दिली. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पांडुरंग बांगर यांचे अल्पशा आजाराने निधन



हिंगोली- येथील वंजारवाडा भागातील रहिवासी सामाजिक व धार्मिक कामातील अग्रेसर व्यक्तिमत्व पांडुरंग योगाजी बांगर वय ७३ वर्ष यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. माऊली, या नावाने सर्वत्र ते प्रसिद्ध होते. कयाधू तीरावरील स्मशान भूमी येथे आज सकाळी ११-०० वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आला. याप्रसंगी मोठा जनसमुदाय अंत्यसंस्काराला उपस्थित होता. रक्षाविधीचा कार्यक्रम उद्या दिनांक ०९ मार्च २०२५ रोज रविवार सकाळी ९-०० वाजता होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, पुतणे, पुतणी व नातवंडे असा मोठा परिवार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष बिडी बांगर यांचे ते काका होत. निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### श्री सद्गुरू सेवा प्रतिष्ठानच्यावतीने हिंगोली भव्य सनातन वैदीक धर्मोत्सवाचे आयोजन

हिंगोली- शहरातील श्री सद्गुरू सेवा प्रतिष्ठाणच्यावतीने भव्य सनातन वैदिक धर्मोत्सव चतुर्वेद पारायण यज्ञोत्सव अनुष्ठान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदर भव्य दिव्य धार्मिक सोहळा दि. १९ मार्च ते २३ मार्च या कालावधीत संपन्न होणार आहे. सदर कार्यक्रमामध्ये महिलांसाठी विशेष म्हणजे कुंकुमार्चन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, कुंकुमार्चन कार्यक्रम दि. २१ मार्च शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता होणार आहे तसेच. रोज दैनंदिन मुळ ग्रंथ असलेले वेद यांचे पारायण विद्वान ब्रम्हवृंदांद्वारे संपन्न होणार आहे , सकाळी १० ते १२ पाचही दिवस नाम जप होणार आहे. दि. १९,२० मार्च रोजी शांती पाठ पुजनासाठी सहभाग नोंदवता येणार आहे तसेच २१ व २२ मार्च रोजी दत्त मुर्ती अभिषेक या मध्ये सर्वांना सहभाग नोंदवता येणार आहे . रोज संध्याकाळी ६ वाजता विष्णु सहस्त्रनाम, रामरक्षा , शांती पाठ, पंचपदी आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत सर्वांनी अध्यात्म धार्मिक यांची अनुभुती घेण्यासाठी कार्यक्रमाला अवश्य यावे असे आवाहन श्री सद्गुरू सेवा प्रतिष्ठाणच्यावतीने करण्यात आले आहे , शांती पाठ पुजन, दत्त मुर्ती अभिषेक, कुंकु मार्चन साठी पूर्व नोंदणी आवश्यक आहे असे श्री सद्गुरू सेवा प्रतिष्ठाण अध्यक्ष लक्ष्मीकांत पाठक यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी श्री सद्गुरू सेवा प्रतिष्ठाणशी संपर्क साधावा असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

### ३८ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३८ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली असून त्यांचेकडून २७ हजार दंड वसुल करण्यात आला आहे.

# श्री विसर्जनाच्या जाचक अटी वगळण्यासाठी आ. मुटकुळेंना साकडे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मार्च**

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या १२ मे २०२० च्या श्री विर्सजन अटीमध्ये काही जाचक अटीमुळे गणेशोत्सवामध्ये मोठे संकट निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्या जाचक अटी काढाव्यात या मागणीसाठी श्री गणेश मुर्तिकार कुंभार समाज संघटनेतर्फे आ. तान्हाजी मुटकुळे यांच्याकडे साकडे घालून निवेदन देण्यात आले.

१२ मे २०२० रोजी केंद्रीय प्रदुषण मंडळाची मुर्ति विर्सजनावर गाईडलाईन (अट) आली. त्यामध्ये पिओपी बंद करण्यात आली आहे. पीओपीवर संशोधन असणार्या शास्त्रज्ञांच्या मते पिओपी ही ईको फ्रेंडली असून प्रदुषणकारी नाही. पिओपी विघटन होण्यास वेळ लागतो. परंतु त्याचे विघटन व रिसायकल होते. पिओपी बंद करावयाचे असल्यास त्यास योग्य पर्यायी मटेरीअल शासनाने उपलब्ध करून द्यावे, तोपर्यंत पीओपी वापरास परवानगी द्यावी, पीओपी व्यतिरिक्त शाडू माती हा योग्य पर्याय नाही, पीओपी बॅन झाल्यास देशातील सर्वात मोठा हिंदूचा सन अडचणीत येईल, त्यावर मोठे अर्थकारण, बेरोजगारी व जनमानसांच्या भावना जोडलेल्या आहेत अशी मागणी करून या संदर्भात आ. तान्हाजी मुटकुळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी चंदू लव्हाळे यांच्या समवेत श्री गणेश मुर्तिकार कुंभार समाज संघटनेचे अशोक बंबरुले, राजू बनचरे, गजानन बंबरूले, सचिन बनचरे, राधेशाम पेरीया, राजू पेरीया, गजू बंबरूले, दिपक बंबरूले, संतोष भुसांडे, रघूनाथ बंबरुले, कुसुमबाई बंबरुले, नंदाबाई बनचरे, सुनंदा बंबरूले, संगिता बंबरुले, धोंडू भुसांडे आदींची उपस्थिती होती.

# जिल्ह्यातील बेरोजगारांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणाची सुवर्ण संधी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मार्च**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर हिंगोली आणि कै. देवरावजी कल्याणकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कळमनुरी यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली जिल्ह्यातील नोकरी इच्छूक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कै. देवरावजी कल्याणकर माध्यचिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केंब्रीज स्कूल ऑफ स्कॉलर्स कॅम्पस, कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ, कळमनुरी येथे दिनांक ११ मार्च २०२५ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा तथा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षण भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात शिवाजी महाविद्यालय हिंगोली, महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय कामठा फाटा कळमनुरी, नारायण वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर, रावसाहेब पतंगे महाविद्यालय वसमत, शिऊर साखर कारखाना वाकोडी ता.कळमनुरी, कपिश्वर सहकारी साखर कारखाना जवळा बाजार, टोकाई साखर कारखाना कुरुंदा, किर्ती ग्रोटेक एमआयडीसी हिंगोली, ओमप्रकाश देवडा पिपल्स को-ऑपरेटीव्ह बँक हिंगोली, जगतगुरु तुकाराम महाराज नागरी सहकारी पतसंस्था वसमत, शिवपार्वती पोल्ट्री फिड प्रा.लि. हिंगोली, दत्तगुरु फार्मर प्रोड्यूसर कंपनी कळमनुरी, धनंजय मोटार्स हिंगोली, भारत फायनान्स लि. हिंगोली, स्वतंत्र मायक्रोफायनान्स नांदेड, भारतीय जीवन बिमा निगम हिंगोली, क्रेडिट एक्सेस ग्रामीण लि. हिंगोली (मायक्रो फायनान्स), भास्कर सर्व्हिस अँड सप्लायर प्रा.लि.पुणे इत्यादी आस्थापनांची ३०० पेक्षा अधिक रिक्त पदे दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर या शैक्षणिक अर्हतेनुसार कौशल्य विकास विभागाच्या तसेच शासनाच्या विविध विभागाच्या योजनाची माहिती देण्याकरिता जिल्ह्यातील विविध महामंडळ स्टॉल लावून माहिती देणार आहेत. कौशल्य विकास विभागाच्या संकेतस्थळावर भेट देवून ऑनलाईन अर्ज करावेत आणि स्वतः मूळ कागदपत्रासह दिनांक ११ मार्च, २०२५ रोजी सकाळी १० वाजता कै. देवरावजी कल्याणकर माध्यमिक व उच्च विद्यालय, केंब्रीज स्कूल ऑफ स्कॉलर्स कॅम्पस, कळमनुरी येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे. या मेळाव्याच्या अधिक माहितीसाठी ०२४५६-२२४५७४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# बळसोंड येथे संजीवनी अभियानाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मार्च**

तालुक्यातील बळसोंड ग्राम पंचायत कार्यालय येथे संजिवनी अभियान जिल्हास्तरीय उद्घाटन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पांडुरंग फोपसे , तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, सरपंच शैलेश जयस्वाल, उपसरपंच ताराबाई चव्हाण, ग्रामपंचायत अधिकारी दत्ता केंद्रे, जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी मारोतराव पोले, प्रकाश बर्वे, मारोती सोलापुरे, रविंद्र भालेराव, व्ही.एन. घोडके, आदींची प्रमुख उपस्थीती होती. सार्वजनिक आरोग्य विभाग जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत जागतिक महिला दिनानिमित्ताच्या अनुषंगाने संजीवनी अभियान एकजूट होऊ या कर्करोगाला हरवू या.

सध्याच्या काळात बदलती जीवनशैली ताणतणाव यामुळे अनेक आजारांना समाजाला तोंड द्यावे लागत आहे. यात प्रामुख्याने महिलांच्या बाबतीत कर्करोगाची समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी महिलांनी स्वतःहून आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. आपले आरोग्य सुदृढ राहण्यासाठी महिलांनी जागृत व्हावे. एकजूट होवु या, कर्करोगाला हरवू या! याप्रमाणे महिलांनी स्वतः समोर येऊन वेळेत तपासणी करून घ्यावी. असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी केले.

# अबु आझमी यांच्या फोटोला जोडेमारो आंदोलन, कराडला फाशी द्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ मार्च**

युवा सेनेच्यावतीने मसाजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मिक कराडला फाशी द्यावी तसेच औरंगजेब धार्जिणा अबू आजमी यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात युवासेनेचय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वाल्मिक कराड आणि अबु आझमी यांच्या छायाचित्रास जोडेमारो आंदोलन करीत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी स्व संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधार वाल्मिक कराड यास फाशी देण्याची मागणी करण्यात आली तसेच अबु आझमी यांचा निषेध करण्यात आला. यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख राम कदम, संजय बोंढारे, विजू पाटील, अमोल खिल्लारी, पिंटू कांडलीकर, गजानन पाटील, दत्ता माने, दत्ता बोंढारे, अभय पाटील, ओम कदम, ज्ञानेश्वर माऊली, राजू पाटील, संतोष गोरे, लखन कुरील, सुरेश शेळके, गजानन पोकर वसंतराव अवचार, विश्वनाथ चव्हाण, शिवाजी जाधव, शैलेश उबाळे, अजिंक्य भालेराव प्रफुल सूर्यवंशी शिवा पवार राहुल काळे, अभय चव्हाण सुमित कदम वैभव जवळकर, शंकर सावळे, प्रताप प्रवीण बुरंगे, अतुल जाधव, संतोष माहूरकर, शिवा पाटील, विश्वनाथ घोडके, अमर तिडके, भैया ठाकूर, ज्ञानेश्वर तावरे, अक्षय पतंगे, पवन सरकटे, ज्ञानेश्वर कदम, मुस्ताक प्यारेवाले, प्रफुल सूर्यवंशी, नितेश कवाने, अभय चव्हाण, शंकर सावळे, गोरख जाधव गौरव गायकवाड, युवासेना उपजिल्हाप्रमुख मयूर शिंदे, युवासेना उपजिल्हाप्रमुख गजानन भोसले, युवासेना तालुका प्रमुख सचिन पेंढारकर, युवासेना शहर प्रमुख रवी शिंदे, युवासेना माथा सर्कल प्रमुख प्रदीप गिरी व मोठ्या संख्येने शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# शिरूरमध्ये १५ लाखाचा गुटखा पकडला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मार्च**

बीड जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवाया करून अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्री.नवनीत सर यांनी दिल्या आहेत. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. उस्मान यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून हिवरसिंगा ता. शिरूर कासार येथील एक इसम याने महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत गुटख्याचा साठा केला असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्यांचे पथकास सुचना देवून कारवाईसाठी रवाना केले असता

आज दिनांक ०८/०३/२०२५ रोजी मौजे हिवरसिंगा ता. शिरूर येथे इसम नामे बंडू निवृत्ती जाधव रा. हिवरसिंगा यांचे घरी छापा टाकला असता एकूण १४,५०,३२०/- किंमतीचा विमल गुटखा मिळून आला. संबंधित आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन शिरूर कासार येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा.श्री. नवनीत सर , पोलीस अधीक्षक बीड, मा.श्री. सचिन सर, अप्पर पोलीस अधीक्षक, बीड मा.श्री.उस्मान सर, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली

पोलीस उपनिरीक्षक श्रीराम, पो.हवा.अशोक, दीपक, सोमनाथ, बाळू, अर्जुन, नारायण, सिद्धेश्वर असे स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.



## दिंडी प्रदक्षिणाने होणार संगीतमय श्रीमद् भागवत कथा सोहळ्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मार्च**

बीड तालुक्यातील नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी ता. जि.बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा बीजसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे या बीज उत्सवानिमित्तआज दि.९/३/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता शिवप्रतिष्ठान वारकरी शिक्षण संस्था दहिफळ वड माऊली येथील ह.भ.प.बाळू महाराज बसवर आणि त्यांचे शिष्यगण हे संत तुकाराम महाराज व राधा कृष्ण यांच्या वेशभूषेत दिंडीत सहभागी होणार आहेत तसेच भजनी मंडळ देखील दिंडीत सामील होणार आहे ह.भ.प. सौ.साक्षीताई कराडकर तसेच सर्व गायनाचार्य वादनाचार्य यांचे स्वागत मोठ्या उत्साहात होणार आहे त्यांनतर दुपारी १ वाजता संगीतमय श्रीमद संगीत भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा प्रारंभ होणार आहे

या संगीतमय भागवत कथेसाठी तबलासाथ ह.भ.प श्री राम महाराज गायकवाड, शिंथवादन व गायनाचार्य ह.भ.प.श्री तुकाराम महाराज कराडकर, गायन साथ ह भ प शालिनीताई जाधव बीड, ऑक्टोपॅड वादक श्री रवी महाराज हिंगोली हे आहेत कथा वेळ दुपारी १ते ५अशी आहे. या सात दिवस होणाऱ्या श्रीमद् भागवत कथा अमृत श्रवणाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक समस्त कळेकर परिवार व महादेव नाना साळुंके यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने रंगले श्रीराम इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन

विद्यार्थ्यांचे धमाल नृत्य; मुलगी वाचवा, मोबाईलचे दुष्परिणामावर नाटकातून जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ मार्च**

गेवराई तालुक्यातील लुखामसला येथील श्रीराम इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने चांगलेच रंगले. विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर करुन उपस्थित मान्यवर तसेच ग्रामस्थांची मने जिंकली. यावेळी मुलगी वाचवा, मोबाईलचे दुष्परिणामावर विद्यार्थ्यांनी नाटक सादरीकरण करुन जनजागृती देखील केली.

श्री जय शिवशंकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित श्रीराम इंग्लिश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, दैठणचे सरपंच प्रतापसिंह पंडित, लुखामसला गावचे सरपंच रावसाहेब काळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विलास अण्णा पंडित, रमेशराव पंडित, बाळासाहेब पंडित, केंद्रप्रमुख एकनाथ नरके सर, व्हाईस ऑफ मिडीयाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष भागवत जाधव, गेवराई तालुका दक्ष पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद नरसाळे, बीड पोलिस संतोष तांबे, श्याम चाळक सर, प्रशांत नरके, प्रशांत मस्के, राजेंद्र वाकडे सर, संतोष थोरात सर, दिलीपराव लांडगे आदींसह आलेल्या सर्व पाहुण्यांचे संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# आदित्य एज्युकेशन ग्रुपला बीडमध्ये मानाचं पान

## आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हर्च्युअललर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळेला मिळाली मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मार्च**

आदित्य शिक्षण संस्था ही बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील एक नावाजलेलं नाव आहे. संस्थेने शिक्षणाचा दर्जा कायम राखत प्रगती केली आहे. आज आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी देशात आणि देशाबाहेरील नामवंत संस्थेत मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. आदित्य शिक्षण संस्थेला पुन्हा एकदा बीड जिल्ह्यात मानाचे पान मिळाले असून आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हर्च्युअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळेला मिळाली मान्यता मिळाल्याने आता बीड जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थी येथे येवून प्रात्यक्षिक, तांत्रिक नॉलेज प्रगत करता येणार आहे.

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयास शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (यांत्रिकी विद्यापीठ),पुणे आणि आय आय टी खरगपूर यांच्या संयुक्त विद्यमाने (वर्चुअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळा) मान्यता मिळाली असुन समंजस करार झालेला आहे. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना डव्हान्स नेटवर्किंग, व्हर्च्युअल लर्निंग टूल्स आणि कटिंग एज टेक्नॉलॉजी बद्दलची ॲडव्हान्स माहिती या लॅब द्वारे विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक तांत्रिक नॉलेज प्रगत करण्यासाठी मदत होणार आहे.

या कार्यशाळेचे शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील नॉलेज यामधील दुवा भरून निघणार आहे. ही कार्यशाळेची परवानगी मिळण्यासाठी आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर पंकज कडू यांनी संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले. इतर महाविद्यालयाचे विभाग प्रमुख आणि प्राध्यापक यांनी परिश्रम घेतले.

बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होणार आदित्य शिक्षण संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आदित्य शिक्षण संस्था शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असल्याने आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयाला व्हर्च्युअल लर्निंग आणि नूडल्स सेंटर कार्यशाळेला शासनाची मान्यता मिळाली आहे. या कार्यशाळेचा आदित्य शिक्षण संस्थेसह जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डव्हान्स नेटवर्किंग, व्हर्च्युअल लर्निंग टूल्स आणि कटिंग एज टेक्नॉलॉजी बद्दलची ॲडव्हान्स माहिती या लॅब द्वारे मिळणार आहे. विद्यार्थ्यांना येथे येवून प्रात्यक्षिक करता येणार आहे. त्यांच्या तांत्रिक नॉलेजमध्ये मोठी भर पडणार आहे.

-डॉ. आदित्य सारडा, संचालक
आदित्य शिक्षण संस्था

# महिलांना एकच दिवस नाही तर नेहमीच सन्मान मिळावा-सौ.गौरी डावखरे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मार्च**

स्त्री म्हणजे त्याग, प्रेम, कणखरपणा आणि प्रेरणा! ती एक आई आहे, जी संपूर्ण आयुष्यभर आपल्या कुटुंबासाठी झटत असते. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री आज सर्व क्षेत्रात पुढे पडत आहे. त्यामुळे महिलांना एकच दिवस नाही तर नेहमीच सन्मान मिळावा. स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात आयोजित महिला दिनाच्या कार्यक्रमात अध्यक्षीय समारोपात असे प्रतिपादन सौ. गौरी डावखरे यांनी केले.

मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महिला ही एक दिवसाची स्त्री व अनंत काळाची माता असते असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

श्री. मुकुंद मिरगे यांनी आपल्या मनोगतात महिलांच्या सर्व क्षेत्रातील योगदान सविस्तरपणे विशद केले. भारतीय संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी महिला हा एक महत्त्वाचा घटक आहे असे प्रतिपादन केले.



याप्रसंगी सर्व महिला शिक्षिकांचा पेन व गुलाब पुष्प देऊन पुरुष शिक्षकांनी सन्मान केला.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी सौ. गौरी डावखरे, मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, उपमुख्याध्यापक श्री माधव जोशी, प्रमुख वक्ते श्री मुकुंद मिरगे व सर्व महिला शिक्षिका उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. सुनील पुलकुर्ते यांनी केले. तर सुत्रसंचलन विनायक कुलकर्णी यांनी केले. शरद ढवळे यांनी आभार प्रदर्शन केले. कु. सुरभी निराळे या विद्यार्थीनीने सुंदर गीत सादर केले.

## महाजनवाडी गावातील शेतकऱ्यांचे सोयाबीन आणि कडबा शार्क सर्किटने जळाले अंदाजे लाखांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**लिंबागणेश दि.८ मार्च**

बीड तालुक्यातील मौजे महाजनवाडी येथे दि.७ सोमवार रोजी दुपारी २ वाजता शार्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे येथील गट नंबर २१७ मधील शेतकरी बाबासाहेब लक्ष्मण घरत यांचे १५ क्विंटल सोयाबीन आणि २०० ज्वारीचा कडबा असे एकुण ६५ हजार रूपयांचे नुकसान झाले तर लगतच्या गट नंबर २१६ मधील शेतकरी राणुबाई रामचंद्र शिंदे यांच्या शेतातील सोयाबीन १० क्विंटल अंदाजे किंमत ४० हजार रुपये शार्ट सर्किटमुळे जळाले. महावितरणच्या गलधान कारभारामुळे हि आग लागुन नुकसान झाल्याने आम्हाला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी फोनवरून तहसीलदार चंद्रकांत शेळके,महावितरणचे अभियंता अभिजित शिंदे आणि नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना फोन वरून कल्पना दिली असुन पंचनामा करण्यासाठी कर्मचारी पाठवतो म्हणाले. नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला.

## अंबा साखर कारखान्याचे माजी संचालक वसंत शिंदे यांचे दुःखद निधन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ मार्च**



अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक वसंत शिंदे यांचे दुःखद निधन झाले आहे .

वसंतराव शिंदे हे अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक होते तसेच अंबाजोगाई भाजपा तालुका सचिव होते. त्यांच्या पश्चात पत्नी , एक मुलगी रमाकांत व सूर्यकांत शिंदे मुले,सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर आज मुळगावी आपेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ मार्च**

सुंदराराव सोळंके महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त ऑनलाईन व्याख्यान घेण्यात आले तसेच महिला प्राध्यापिकांचा व महिला कर्मचाऱ्यांना सत्कार करून महिला दिन साजरा करण्यात आला.

सुंदराराव सोळंके महाविद्यालयात महिला दिनानिमित्त महिला कक्षाच्या वतीने ऑनलाईन वेबिनार घेण्यात आला.यावेळी कोल्हापूर येथील राजश्री साकळे यांनी स्त्री पुरुष समानतेच्या कार्यपद्धतीला गती देणे या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ अर्चना कचरे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांची प्रमुख उपस्थिती होती.वेबिनारचे सूत्रसंचालन प्रा.वैशाली शहाणे यांनी केले तर आभार प्रा. नमिता वडमारे यांनी केले.

प्रारंभी महिला दिनानिमित्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. जी.के. सानप, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, पर्यवेक्षक प्रा. एम. के. अलझेंडे, प्रा.सुदर्शन स्वामी,प्रा. संजय बागुल यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका व महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार प्राचार्य डॉ. जी. के.सानप यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी डॉ.अर्चना कचरे, प्रा.वैशाली शहाणे, प्रा. संगीता शेजुळ,प्रा.नमिता वडमारे,श्रीमती मिना डक,श्रीमती जी. व्ही.मुसळे,,अनिता पवार आदींची उपस्थिती होती.



## लोकमान्य टिळक विद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ मार्च**

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश मातेकर, प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती वनमाला बनाळे उपस्थित होत्या.याप्रसंगी बोलताना बनाळे ताई म्हणाल्या की, जागतिक महिला दिन साजरा करतांना महिलांना समाजात समानतेच्या संधी मिळणे आवश्यक असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.महिलांनी आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न केला तर त्या स्वयंपुर्णतेकडे वाटचाल करतील असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात ज्ञानेश मातेकर म्हणाले की, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण भारत देशातील कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचे स्मरण केले पाहिजे.प्राचिन मध्ययुगीन ते आधुनिक भारताच्या इतिहासात अनेक कर्तृत्ववान महिलांनी इतिहास घडवला आहे, त्यांच्या कार्याची दखल घेतली पाहिजे.याची नोंद क्रमिक अभ्यासक्रमात झाली पाहिजे तरच त्यांचा आदर्श घेऊन भावी पिढी मार्गक्रमण करतील असा विश्वास व्यक्त केला.



जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यालयात पोखरी गावातील आशा ताई व ग्रामपंचायत सदस्या यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी गावातील माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रणिता धोंड,तर आभार प्रदर्शन शांती मंत्र राकेश मोरे यांनी केले.यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनींनी उत्साहाने सहभाग घेतला होता.

## जागतिक महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मार्च**

बीड जिल्हा कारागृह दिनांक ८ मार्च रोजी रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन या संस्थेमार्फत कारागृहात महिला बंदीसाठी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

हा दिवस महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय योगदानाचा सन्मान करण्यासाठी समर्पित करण्यात येतो. महिलांच्या हक्कांसाठीच्या लढ्याचा हा एक प्रतीकात्मक दिवस आहे, जो महिलांच्या सशक्तीकरणाची जाणीव करून देतो. असे या कार्यक्रम प्रसंगी विचार मांडले.

रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व जन शिक्षण संस्था बीड यांच्याकडून महिला दिनाचे औचित्य साधून महिला बंद्यासाठी मेहंदी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन रोटरी क्लब अध्यक्ष नितीन गोपन व बीड कारागृहाचे प्रभारी अधीक्षक बक्सार मुलांनी यांच्या हस्ते करण्यात आले.



सर्व महिला बंदी व महिला कर्मचारी यांना याप्रसंगी भेटवस्तुही देण्यात आली

याप्रसंगी सदर कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ बीड व जनशिक्षण संस्थेचे श्री नितीन गोपान श्री. निलेश जगदाळे श्री गंगाधरजी देशमुख श्री जयप्रकाश कारविन्न सौ. नंदा साळुंखे सौ.अश्विनी जाधव सौ संगीता मानसवरार तसेच बीड जिल्हा कारागृह येथील प्रभारी अधीक्षक बक्सार मुलानी कर्मचारी श्री ज्ञानेश्वर डोईफोडे सौ भाग्यश्री वास्टर सौ अश्विनी भालेराव सदर कार्यक्रमास उपस्थित होते.